# वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पश्चिम), जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०३
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र.** १४९३

विभाग :- पाणी पुरवठा
दिनांक :- १६ / १० / २०२५

---

| | | |
|---|---|---|
| विषय | :- | सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा उसगाव / शिरवली उद्भव २० द.ल.ली. क्षमता योजनेच्या जलवाहिन्यांची देखभाल दुरुस्ती करणे कामी येणा-या अपेक्षित खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. |
| प्रस्तावित नाव | :- | सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा उसगाव / शिरवली उद्भव २० द.ल.ली. क्षमता योजनेच्या जलवाहिन्यांची देखभाल दुरुस्ती करणे. |
| अंदाजपत्रकीय रक्कम | :- | रु. ४५ लक्ष (१८% GST सह) |
| कामाची आश्यकता | :- | वसई विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा उसगाव / शिरवली उद्भव २० द.ल.ली. पाणी पुरवठा होत असून उसगाव व शिरवली येथे उद्चंन केंद्र तसेच पारोळ येथे जलशुध्दीकरण केंद्र आहे. शिरवली येथून २.५ कि.मी. व उसगाव येथून १० कि.मी. ६०० मी. मी. व्यासाच्या PSC / MS उर्ध्ववाहिन्या पारोळ जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत अंथरण्यात आल्या आहेत. |

पारोळ जलशुध्दीकरण येथे पाणी शुध्दीकरण करण्यात येऊन ७०० मी.मी. व्यासाची एकूण १२ कि.मी. ची PSC/MS उर्ध्ववाहिनी चंदनसार MBR पर्यंत अंथरण्यात आली आहे. चंदनसार MBR ते विरार पश्चिम, नालासोपारा, गास पर्यंत ६०० कि.मी. व्यासाची मुख्य जलवाहिनी अंथरण्यात आली आहे. उपरोक्त जलवाहिनी मधील हवा बाहेर काढणे करीता प्रति ३५० मीटर अंतरावर १०० मी.मी, १५० मी.मी व्यासाचे Air Valve बसविण्यात आले आहेत. सदरची उसगाव योजना सन १९९६ मध्ये कार्यान्वीत करण्यात आली असून सदर योजनेच्या जलवाहिनीस २५ वर्षाचा कालावधी उलटून गेला आहे. त्यामुळे जलवाहिनीस वारंवार गळती होण्याचे प्रमाण वाढले आहे.

त्यामुळे वसई विरार शहरास पाणी पुरवठा सुस्थितीत ठेवण्याकरीता सदर योजनेच्या जलवाहिन्यांची देखभाल दुरुस्ती तसेच जलवाहिनीवरील Air Valve ची देखभाल दुरुस्ती करणे आवश्यक असून त्याकरीता सद्य:स्थितीत अस्तित्वातील मंजूर निविदांची मुदत दि.३१/११/२०२५ रोजी संपुष्ठात येणार आहे. त्यामुळे योजनेच्या जलवाहिन्या नादुरुस्त झाल्यास महानगरपालिकेची संभाव्य गैरसोय टाळण्याकरीता नवीन ठेकेदाराची नियुक्ती करणे आवश्यक आहे.

उसगाव / शिरवली २० द.ल.ली. क्षमता योजनेच्या जलवाहिन्यांची देखभाल दुरुस्ती करणे कामी सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाकरीता रक्कम रु. ४५ लक्ष खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च हा **"उसगाव योजना देखभाल दुरुस्ती"** या लेखाशिर्षा अंतर्गत उपलब्ध तरतुदी मधून भागविणे शक्य आहे.

तरी विषयांकीत कामी तयार केलेल्या अंदाजपत्रकीय बी /१ प्रकारची निविदा मागविण्यास व होणाऱ्या अनुषंगीक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता आवश्यक आहे.

लेखाशिर्ष व तरतूद :- "उसगाव योजना देखभाल दुरूस्ती "

तरी सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा उसगाव / शिरवली उद्भव २० द.ल.ली. क्षमता योजनेच्या जलवाहिन्यांची देखभाल दुरुस्ती करणे कामी बी/१ प्रकारची ई - निविदा मागविण्यास तसेच अंदाजपत्रकीय खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेस्तव सविनय सादर.

---

**ठराव** :- सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा उसगाव / शिरवली उद्भव २० द.ल.ली. क्षमता योजनेच्या जलवाहिन्यांची देखभाल दुरुस्ती करणे कामाची बी/१ प्रकारची ई निविदा मागविण्यास व अनुषंगीक रक्कम रु. ४५ लक्ष खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देणेत येत आहे.

मनोजकुमार सुर्यवंशी ( भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (प.), जि. - पालघर, पिन नं. 401 303
दुरध्वनी - 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स - 0250-2525107,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र.** १४१४ विभाग :- पाणी पुरवठा
दिनांक :-१६/१०/२०२५

---

**प्रस्तावाचा विषय** :- केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अंतर्गत वसई-विरार शहर महानगरपालिका अस्तित्वातील पाणी पुरवठा योजना बळकटीकरण व विस्तारीकरण करणेकामी त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरिक्षण करून घेणेकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर** :- केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अंतर्गत वसई-विरार शहर महानगरपालिका अस्तित्वातील पाणी पुरवठा योजना बळकटीकरण व विस्तारीकरण करणेकामी महापालिकेचे सल्लागार मे. टंडन अर्बन सोल्युशन्स प्रा. लि. यांनी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला असून त्यास वसई-विरार शहर महानगरपालिकेने प्रशासकीय ठराव क्र.१०२७ दि.०४/१०/२०२२ अन्वये आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिली आहे.

मा. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, कोंकण विभाग, ठाणे यांनी दि.२३/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये रु.४९६,८०,८३,१३१/- किंमतीच्या सविस्तर प्रकल्प अहवालास तांत्रीक मंजूरी दिली असून महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक अमृत-२०२३/प्र.क्र.८५/नवि-३३ दि.०६/०३/२०२३ अन्वये उक्त कामी रु.४९४.११ कोटी किंमतीच्या सविस्तर प्रकल्प अहवालास प्रशासकीय मंजूरी दिली आहे.

सदर मान्यतेनूसार अमृत २.० अंतर्गत महापालिकेने दोन पॅकेजमध्ये (२ पार्ट मध्ये) दोन स्वतंत्र ई- निविदा मागविल्या असून लघुत्तम निविदाधारक यांना खालील प्रमाणे कार्यादेश देण्यात आले आहेत.

| | लघुत्तम निविदाधारक | मंजूर दर | संविदा ठराव | कार्यादेश दिनांक | स्विकृत किंमत |
|---|---|---|---|---|---|
| पॅकेज - १ | मे. एस.एम.सी.- एस.बी.के. (J.V.) | ७.३०% जादा | ठराव क्र. ३०३९ दि.१२/२/२०२४ | दि. १६/२/२०२४ | रु. १७१.७४ कोटी |
| पॅकेज - २ | मे. एस.बी. के. - के.सी.सी.एल (JV) | ८.७७% जादा | ठराव क्र.१२८२ दि.७/१०/२०२४ | दि.९/१०/२०२४ | रु. ३४९.१८ कोटी |

वरील प्रमाणे मंजूर ठेकेदार यांना कार्यादेश देण्यात आले असून त्यांच्यामार्फत कामे प्रगतीपथावर आहेत.

शासकीय अनुदानातून व महापालिका स्व:निधीतून पाणी पुरवठा योजनेचे काम सुरू असून सदर कामाची गुणवत्ता तसेच काम योग्य पध्दतीने व मंजूर आराखड्यानुसार होत आहे किंवा नाही या करिता कामांच्या टप्प्यानुसार त्रयस्थ संस्थेमार्फत तांत्रिक लेखापरीक्षण करून घेण्याबाबत मा. प्रधान सचिव, नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन शासन स्तरावरून VC व्दारे झालेल्या आढावा बैठकींमध्ये निर्देश दिले आहेत. त्यामुळे सदर कामी त्रयस्थसंस्थेमार्फत कामाचे तांत्रिक लेखापरीक्षण करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय दि.२८/०३/२०१८ नुसार १) IIT मुंबई, २)VJTI मुंबई, ३) VIT नागपुर या तीन संस्थांचा नामसुचीकेत समावेश केला असून रु.१५० कोटी किंमतीपेक्षा जास्त किंमतीचे कामाकरीता कामाच्या किंमतीच्या प्रमाणात ०.५०% फी अदा करण्याबाबत निर्देश आहेत.

उक्त कामाचे तांत्रिक लेखा परिक्षण करण्यासाठी भारतीय प्राद्योगिक संस्थाने, मुंबई (IIT, Mumbai) या संस्थेची नेमणूक केल्यास त्यांच्या मार्फत विविध कामांच्या टप्प्यांवर तांत्रिक लेखापरीक्षण करून घेतल्यास प्रकल्पाचे काम मंजूर आराखड्यानुसार पुर्ण करून घेणे शक्य होईल. व कामाच्या गुणवत्तेबाबत अहवाल महापालिकेस व शासनास सादर करणे सुलभ होईल.

विषयांकीत प्रकल्पाच्या कामांचे तांत्रिक लेखापरीक्षण करण्याच्या दृष्टीने IIT मुंबई यांना त्यांची सहमती व शुल्क कळविण्यास दि.०९/०९/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविले असता त्यांनी याकामी खालील प्रमाणे शुल्क भरणा करण्याबाबत महापालिकेस दि.१८/०९/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

| Sr. No. | Category | Taxable Service | १८% GST | Total | ५०% Advance |
|---|---|---|---|---|---|
| १ | Scientific & Technicla consultancy | २,०७,३४,२५०/- | ३७,३२,१६५/- | २,४४,६६,४१५/- | १,२२,३३,२०७/- |

वरील प्रमाणे प्रकल्पांच्या कामांसाठी तांत्रिक लेखापरीक्षण शुल्क रु.२,४४,६६,४१५/- इतके होत असून ५०% रु.१,२२,३३,२०७/- आगाऊ अदा करण्याबाबत कळविले आहे.

अमृत २.० अभियान अंतर्गत पाणी पुरवठा योजनेच्या कामांच्या अनुषंगाने IIT, मुंबई या त्रयस्थ संस्थेची तांत्रिक लेखापरीक्षणाकामी नियुक्ती केल्यास रु.२,४४,६६,४१५/- (GST सह) इतका खर्च अपेक्षीत आहे. सदर खर्च सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पातील पाणी पुरवठा , भांडवली खर्च "अमृत योजना २ अंतर्गत भुयारी गटार व इतर अनुषंगिक खर्च" या लेखाशिर्षावरून भागविणे शक्य होणार आहे.

सदरकामी येणाऱ्या खर्चास मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेची आवश्यकता आहे. सद्य:स्थितीत शासनाने महापालिकेवर प्रशासक म्हणून मा. आयुक्त यांची नेमणूक केली आहे.

तरी केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अंतर्गत वसई-विरार शहर महानगरपालिका अस्तित्वातील पाणी पुरवठा योजना बळकटीकरण व विस्तारीकरण करणे कामांकरिता IIT, मुंबई या त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरिक्षण करून घेणेकामी एकूण येणाऱ्या रु.२,४४,६६,४१५/- खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळावी तसेच रु.२,४४,६६,४१५/- शुल्काच्या ५०% शुल्क रु.१,२२,३३,२०७/- आगाऊ IIT, मुंबई यांचेकडे भरणा करण्यास प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

---

**ठराव :-**

१. केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अंतर्गत वसई-विरार शहर महानगरपालिका अस्तित्वातील पाणी पुरवठा योजना बळकटीकरण व विस्तारीकरण करणेकामी मंजूर ठेकेदारांना कार्यादेश देण्यात आले असून कामे प्रगतीपथावर आहेत.

२. शासकीय योजनेतून सुरू असलेल्या कामांचे त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण करून घेणे स्थानिक स्वराज्य संस्थांवर बंधनकारक असून उक्त कामाचे त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण IIT मुंबई मार्फत करून घेण्याचे निर्देश शासनाने अमृत २.० च्या व्ही.सी. दरम्यान दिले आहेत.
३. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय दि.२८/०३/२०१८ नुसार १) IIT मुंबई, २)VJTI मुंबई, ३) VIT नागपुर या तीन संस्थांचा नामसुचीकेत समावेश केला असून रु.१५० कोटी किंमतीपेक्षा जास्त किंमतीचे कामाकरीता कामाच्या किंमतीच्या प्रमाणात ०.५०% फी अदा करण्याबाबत निर्देश आहेत.
४. IIT मुंबई यांनी दि.१८/०९/२०२५ च्या पत्राने विषयांकीत कामाचे तांत्रिक लेखापरीक्षण शुल्क रु.२,४४,६६,४१५/- कळविले असून विभागाने या खर्चाच्या मान्यतेचा प्रस्ताव सादर केला आहे त्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.
५. उक्त शुल्कापैकी ५०% शुल्क रु.१,२२,३३,२०७/- आगाऊ IIT, मुंबई यांचेकडे भरणा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

मनोजकुमार सुर्यवंशी (**भा.प्र.से.**)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (प), जि. पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४ ०५/०६ , फॅक्स – ०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. १४१५

विभाग : बांधकाम विभाग

दिनांक : १६ /१०/२०२५

| | | |
|---|---|---|
| **१.प्रस्तावाचा विषय** | :- | वसई- विरार शहर महानगरपालिका समिती (बी) कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ४९ मधील रेहमत नगर येथे अनमोल प्लाझा बिल्डिंग जवळ चेकर्ड लादी बसविणे कामी येणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. |
| **२.अंदाजपत्रकीय रक्कम** | :- | रू. ४,९७,२८२/- |
| **३.प्रस्तावाची गरज** | :- | वसई- विरार शहर महानगरपालिका समिती (बी) कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ४९ मधील रेहमत नगर येथे अनमोल प्लाझा बि ल्डिंग जवळील रस्ता हा कच्च्या स्वरूपाचा सखल रस्ता असल्यामुळे संपूर्ण पाणी रस्त्यावर येते व साचणाऱ्या पाण्यामुळे मोठ्या प्रमाणात डासांचे साम्राज्य आहे. त्यामुळे रोगराई पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच सदर रस्त्यावर वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असल्याने वाहनांना तसेच नागरीकांना ये-जा करताना साचणाऱ्या पाण्यामुळे त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे सदर ठिकाणी भरणी करून लाद्या बसविणे गरजेचे आहे. जेणेकरून नागरीकांना होणारा त्रास दूर होईल. त्याअनुषंगाने अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. |
| **४.कामाचे स्वरूप** | :- | रस्त्याची लांबी ५५.५० मी. व रस्त्याची रुंदी ३.१० मी. |
| **५.यापूर्वी सदर जागेवर झालेल्या कामाचा तपशिल** | :- | पायवाट |
| **६.जागेची मालकी** | :- | महानगरपालिकेची |

वरील काम करण्यासाठी प्रत्यक्ष जागेची पाहणी करून सन २०२२-२३ च्या वित्तीय वर्षाच्या सार्वजनिक बांधकामविभागाच्या दर सूचीनूसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

तरी सदरचे काम हे महाराष्ट्र शासन निर्णय क्र. भांखस २०२१/प्र.क्र.८/उद्योग -४ दि.०७/०५/२०२१ अन्वये रू.१०.०० लक्ष पर्यंत निविदा मागवून कार्यवाही करण्याची मुभा आहे.

तरी सदरची कामे जलदगतीने पूर्ण करावयाची असल्याने वरील नमुद अत्यावश्यक सेवेतील काम कोटेशन पद्धतीने करणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २९ (अ), ६३,६६ तसेच कलम ७३ (क) व (ड) अन्वयेचे अधिकार अधिनियमातील कलम ७२ (ब) अन्वये प्रशासकिय व वित्तीय अधिकाराचे पुन:प्रत्यार्पणाच्या आवश्यकतेनूसार मा. आयुक्त सो. यांचेकडील जा.क्र.वविशम/लेखा/७७/२०२५-२६ दि. ०४/०८/२०२५ च्या आदेशानूसार मा. उप आयुक्त यांचे मान्यतेस्तव सादर.

तरी सदर कामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेऊन तांत्रिक मंजूरी घेणे, ई-निविदा कार्यवाही करणे , संविदा करणे, लघुत्त्म निविदाधारका सोबत करारनामा करून कार्यादेश देणे, काम सुरू करून विहित मुदतीत पुर्ण करणे व देयक सादर करणे इ. सर्व प्रक्रिया पुढील नमुद कायमर्यादेत पुर्ण होणे अपेक्षित आहे.

याकामी खालील विहित करून देण्यात आलेल्या कालावधी मध्ये काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांची असेल

| अ.क्र. | बाब | अपेक्षित दिनांक |
|---|---|---|
| १ | प्रशासकीय व वित्तीय मान्यता ठराव | सक्षम प्राधिकाऱ्यांकडून मंजुरी मिळाल्यानंतर तात्काळ |
| २ | निविदा प्रसिध्द् करणे | दि. ०३/०९/२०२५ |
| ३ | प्रथम लिफाफा उघडणे | दि. १०/०९/२०२५ |
| ४ | द्वितीय लिफाफा उघडणे | दि. १२/०९/२०२५ |
| ५ | संविदा मंजुरी ठराव | दि. १६/०९/२०२५ |
| ६ | कार्यादेश देणे / करारनामा करणे | दि. १८/०९/२०२५ |
| ७ | काम सुरू करणे | दि. १९/०९/२०२५ |
| ८ | काम पुर्ण करणे | दि. १८/१०/२०२५ |
| ९ | देयक सादर करणे | दि. २४/१०/२०२५ |
| १० | देयकाचे प्रदान करणे | दि. ३१/१०/२०२५ |
| ११ | उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे | दि. ०३/११/२०२५ |

तरी सदरचे काम जलदगतीने पूर्ण करावयाचे असल्याने वरील नमूद अत्यावश्यक सेवेतील काम कोटेशन पद्धतीने करण्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २९ (अ), ६३,६६ तसेच कलम ७३ (क) व (ड) अन्वयेचे अधिकार अधिनियमातील कलम ७२ (ब) अन्वये प्रशासकिय व वित्तीय अधिकाराचे पुन:प्रत्यार्पणाच्या आवश्यकतेनूसार मा. आयुक्त सो. यांचेकडील जा.क्र.वविशम/लेखा/७७/२०२५-२६ दि. ०४/०८/२०२५ च्या आदेशानूसार मा. उप आयुक्त यांचे मान्यतेस्तव सादर.

ठराव :- सदर कामाकरीता खालील नमूद केलेल्या कालमर्यादा पाळल्या न गेल्यास संबंधित अधिकारी व त्यांचे अधिनस्त कर्मचारी MCSR १९७९ प्रमाणे कार्यवाहीस पात्र राहतील. तसेच सदर कामामध्ये काही अपरिहार्य कारणास्त्व (तांत्रिक, नैसर्गिक व इतर सबळ कारणास्त्व) विलंब झाल्यास त्या त्या वेळी विलंबास सक्षम प्राधिकाऱ्यांची मंजुरी घेणे बंधनकारक असेल.


| अ.क्र. | बाब | अपेक्षित दिनांक |
|---|---|---|
| १ | प्रशासकीय व वित्तीय मान्यता ठराव | सक्षम प्राधिकाऱ्यांकडून मंजुरी मिळाल्यानंतर तात्काळ |
| २ | निविदा प्रसिध्द् करणे | दि. ०३/०९/२०२५ |
| ३ | प्रथम लिफाफा उघडणे | दि. १०/०९/२०२५ |
| ४ | द्वितीय लिफाफा उघडणे | दि. १२/०९/२०२५ |
| ५ | संविदा मंजुरी ठराव | दि. १६/०९/२०२५ |
| ६ | कार्यादेश देणे / करारनामा करणे | दि. १८/०९/२०२५ |
| ७ | काम सुरू करणे | दि. १९/०९/२०२५ |
| ८ | काम पुर्ण करणे | दि. १८/१०/२०२५ |
| ९ | देयक सादर करणे | दि. २४/१०/२०२५ |
| १० | देयकाचे प्रदान करणे | दि. ३१/१०/२०२५ |
| ११ | उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे | दि. ०३/११/२०२५ |

तरी वसई- विरार शहर महानगरपालिका समिती (बी) कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ४९ मधील रेहमत नगर येथे अनमोल प्लाझा बिल्डिंग जवळ चेकर्ड लादी बसविणे कामी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू. ४,९७,२८२ /- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २९ (अ), ६३,६६ तसेच कलम ७३ (क) व (ड) अन्वयेचे अधिकार अधिनियमातील कलम ७२ (ब) अन्वये प्रशासकिय व वित्तीय अधिकाराचे पुन:प्रत्यार्पणाच्या आवश्यकतेनूसार मा. आयुक्त सो. यांचेकडील जा.क्र.वविशम/लेखा/७७/२०२५-२६ दि. ०४/०८/२०२५ च्या आदेशानूसार प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहेत. तसेच महाराष्ट्र शासन निर्णय क्र. भांखस २०२१/ प्र.क्र. ८ / उद्योग - ४ दि. ०७/०५/२०२१ अन्वये रू. १०.०० लक्ष पर्यंत निविदा मागवून कार्यवाही करण्याची मुभा आहे. तरी सदरचे काम जलदगतीने पूर्ण करावयाचे असल्याने कोटेशन पद्धतीने करुन घेण्याच्या कार्यवाहीस मान्यता देणेत येत आहे. तसेच अंदाजपत्रकामधील प्रत्येक टप्प्यावर केलेल्या कामाचे Geo tagged फोटोग्राफस् सादर करणेत यावे. तदनंतरच कामाची रक्कम अदा करणेत यावी.

उप आयुक्त, परिमंडळ - २
वसई- विरार शहर महानगरपालिका

# वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (प), जि. पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४ ०५/०६ , फॅक्स – ०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. १४१६ विभाग : बांधकाम विभाग

दिनांक : १६ /१० /२०२५

---

**१.प्रस्तावाचा विषय** :- वसई- विरार शहर महानगरपालिका समिती (बी) कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ४७ मधील बादशाह नगर येथील साहील निवास चाळ येथे सी.सी गटार बांधणे कामी येणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

**२.अंदाजपत्रकीय रक्कम** :- रू. ४,९१,७७३/-

**३.प्रस्तावाची गरज** :- वसई- विरार शहर महानगरपालिका समिती (बी) कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ४७ मधील बादशाह नगर येथील साहील निवास चाळ येथे कच्च्या स्वरूपाचे जूने अस्तित्त्वाततील गटार नादुरूस्त अवस्थेत आहे. त्यामुळे गटाराचे संपूर्ण पाणी रस्त्यावर येत असल्यामुळे तसेच साचणाऱ्या पाण्यामुळे डासांचे साम्राज्य मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे रोगराई पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचप्रमाणे नागरीकांना ये-जा करताना त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे सदर ठिकाणी गटार करणे गरजेचे आहे. जेणेकरून नागरीकांना होणारा त्रास दूर होईल. त्याअनुषंगाने अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

**४.कामाचे स्वरूप** :- गटाराची लांबी ३८.०० मी. व रुंदी १.५० मी

**५.यापूर्वी सदर जागेवर झालेल्या कामाचा तपशिल** :- जूने गटार

**६.जागेची मालकी** :- महानगरपालिकेची

वरील काम करण्यासाठी प्रत्यक्ष जागेची पाहणी करून सन २०२२-२३ च्या वित्तीय वर्षाच्या सार्वजनिक बांधकामविभागाच्या दर सूचीनूसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

तरी सदरचे काम हे महाराष्ट्र शासन निर्णय क्र. भांखस २०२१/प्र.क्र.८/उद्योग -४ दि.०७/०५/२०२१ अन्वये रू.१०.०० लक्ष पर्यंत निविदा मागवून कार्यवाही करण्याची मुभा आहे.

तरी सदरची कामे जलदगतीने पूर्ण करावयाची असल्याने वरील नमुद अत्यावश्यक सेवेतील काम कोटेशन पद्धतीने करणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २९ (अ), ६३,६६ तसेच कलम ७३ (क) व (ड) अन्वयेचे अधिकार अधिनियमातील कलम ७२ (ब) अन्वये प्रशासकिय व वित्तीय अधिकाराचे पुन:प्रत्यार्पणाच्या आवश्यकतेनूसार मा. आयुक्त सो. यांचेकडील जा.क्र.वविशम/लेखा/७७/२०२५-२६ दि. ०४/०८/२०२५ च्या आदेशानूसार मा. उप आयुक्त यांचे मान्यतेस्तव सादर.

तरी सदर कामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेऊन तांत्रिक मंजूरी घेणे, ई-निविदा कार्यवाही करणे , संविदा करणे, लघुत्त्म निविदाधारका सोबत करारनामा करून कार्यादेश देणे, काम सुरू करून विहित मुदतीत पुर्ण करणे व देयक सादर करणे इ. सर्व प्रक्रिया पुढील नमुद कायमर्यादेत पुर्ण होणे अपेक्षित आहे.

याकामी खालील विहित करून देण्यात आलेल्या कालावधी मध्ये काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांची असेल

| अ.क्र. | बाब | अपेक्षित दिनांक |
|---|---|---|
| १ | प्रशासकीय व वित्तीय मान्यता ठराव | सक्षम प्राधिकाऱ्यांकडून मंजुरी मिळाल्यानंतर तात्काळ |
| २ | निविदा प्रसिध्द् करणे | दि. ०३/०९/२०२५ |
| ३ | प्रथम लिफाफा उघडणे | दि. १०/०९/२०२५ |
| ४ | द्वितीय लिफाफा उघडणे | दि. १२/०९/२०२५ |
| ५ | संविदा मंजुरी ठराव | दि. १६/०९/२०२५ |
| ६ | कार्यादेश देणे / करारनामा करणे | दि. १८/०९/२०२५ |
| ७ | काम सुरू करणे | दि. १९/०९/२०२५ |
| ८ | काम पुर्ण करणे | दि. १८/१०/२०२५ |
| ९ | देयक सादर करणे | दि. २४/१०/२०२५ |
| १० | देयकाचे प्रदान करणे | दि. ३१/१०/२०२५ |
| ११ | उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे | दि. ०३/११/२०२५ |

तरी सदरचे काम जलदगतीने पूर्ण करावयाचे असल्याने वरील नमूद अत्यावश्यक सेवेतील काम कोटेशन पद्धतीने करण्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २९ (अ), ६३,६६ तसेच कलम ७३ (क) व (ड) अन्वयेचे अधिकार अधिनियमातील कलम ७२ (ब) अन्वये प्रशासकिय व वित्तीय अधिकाराचे पुन:प्रत्यार्पणाच्या आवश्यकतेनूसार मा. आयुक्त सो. यांचेकडील जा.क्र.वविशम/लेखा/७७/२०२५-२६ दि. ०४/०८/२०२५ च्या आदेशानूसार मा. उप आयुक्त यांचे मान्यतेस्तव सादर.

ठराव :- सदर कामाकरीता खालील नमूद केलेल्या कालमर्यादा पाळल्या न गेल्यास संबंधित अधिकारी व त्यांचे अधिनस्त कर्मचारी MCSR १९७९ प्रमाणे कार्यवाहीस पात्र राहतील. तसेच सदर कामामध्ये काही अपरिहार्य कारणास्त्व (तांत्रिक, नैसर्गिक व इतर सबळ कारणास्त्व) विलंब झाल्यास त्या त्या वेळी विलंबास सक्षम प्राधिकाऱ्यांची मंजुरी घेणे बंधनकारक असेल.

| अ.क्र. | बाब | अपेक्षित दिनांक |
|---|---|---|
| १ | प्रशासकीय व वित्तीय मान्यता ठराव | सक्षम प्राधिकाऱ्यांकडून मंजुरी मिळाल्यानंतर तात्काळ |
| २ | निविदा प्रसिध्द् करणे | दि. ०३/०९/२०२५ |
| ३ | प्रथम लिफाफा उघडणे | दि. १०/०९/२०२५ |
| ४ | द्वितीय लिफाफा उघडणे | दि. १२/०९/२०२५ |
| ५ | संविदा मंजुरी ठराव | दि. १६/०९/२०२५ |
| ६ | कार्यादेश देणे / करारनामा करणे | दि. १८/०९/२०२५ |
| ७ | काम सुरू करणे | दि. १९/०९/२०२५ |
| ८ | काम पुर्ण करणे | दि. १८/१०/२०२५ |
| ९ | देयक सादर करणे | दि. २४/१०/२०२५ |
| १० | देयकाचे प्रदान करणे | दि. ३१/१०/२०२५ |
| ११ | उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे | दि. ०३/११/२०२५ |

तरी वसई- विरार शहर महानगरपालिका समिती (बी) कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ४७ मधील बादशाह नगर येथील साहील निवास चाळ येथे सी.सी गटार बांधणे कामी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू. ४,९१,७७३/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २९ (अ), ६३,६६ तसेच कलम ७३ (क) व (ड) अन्वयेचे अधिकार अधिनियमातील कलम ७२ (ब) अन्वये प्रशासकिय व वित्तीय अधिकाराचे पुन:प्रत्यार्पणाच्या आवश्यकतेनूसार मा. आयुक्त सो. यांचेकडील जा.क्र.वविशम/लेखा/७७/२०२५-२६ दि. ०४/०८/२०२५ च्या आदेशानूसार प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहेत. तसेच महाराष्ट्र शासन निर्णय क्र. भांखस २०२१/ प्र.क्र. ८ / उद्योग - ४ दि. ०७/०५/२०२१ अन्वये रू. १०.०० लक्ष पर्यंत निविदा मागवून कार्यवाही करण्याची मुभा आहे. तरी सदरचे काम जलदगतीने पूर्ण करावयाचे असल्याने कोटेशन पद्धतीने करुन घेण्याच्या कार्यवाहीस मान्यता देणेत येत आहे. तसेच अंदाजपत्रकामधील प्रत्येक टप्प्यावर केलेल्या कामाचे Geo tagged फोटोग्राफस् सादर करणेत यावे. तदनंतरच कामाची रक्कम अदा करणेत यावी.

उप आयुक्त, परिमंडळ - २
वसई- विरार शहर महानगरपालिका

# <u>वसई विरार शहर महानगरपालिका</u>

मुख्य कार्यालय, विरार (पश्चिम), ता. वसई, जि. पालघर, पिन नं. ४०१३०३.
दुरध्वनी :- ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६ फॅक्स :- ०२५०-२५२५१०७
ई-मेल :- vasaivirarcorporation@yahoo.com

**प्रशासकीय ठराव क्र.** १४९७ **विभाग:- घनकचरा व्यवस्थापन**
**दिनांक:-** १६ /१० **/२०२५**

**प्रस्तावाचा विषय :-** नागरी घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत दैनंदिन रस्ते सफाई, गटार सफाई, कचरा संकलन व क्षेपणभूमीवर वाहतूक करणेसाठीच्या निविदेस सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाकरिता देयकामध्ये ६% वाढ देणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर:-** नागरी घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी अधिनियम २०१६ अन्वये महानगरपालिकांतर्गत असलेल्या ९ प्रभाग समिती निहाय २० झोन तयार करुन दैनंदिन रस्ते सफाई, गटार सफाई, कचरा संकलन करुन क्षेपणभूमीवर वाहतुक करणे इत्यादी कामांसाठी इच्छूक संस्था/कंत्राटदार/अभिकर्त्यांकडून सन २०१७-१८, सन २०१८-१९ सन २०१९-२० या त्रैवार्षिक वित्तीय वर्षांकरिता प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेऊन ई-निविदा प्रक्रिया करणेस मान्यता देण्यात आली होती. जाहिर ई-निविदा राज्यस्तरीय व स्थानिक दैनंदिन वृत्तपत्रात प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार निविदा प्रक्रिया पुर्ण करुन संविदा आणि करारनामा करुन मंजूर निविदाकरांस कार्यादेश देण्यात आला होता.

शहराचे वाढते नागरीकरणामुळे कचऱ्याच्या प्रमाणात वाढ होत असल्याने आणि प्रभाग निहाय स्वच्छता निरीक्षकांच्या अहवालानुसार मनुष्यबळात वाढ करणे आवश्यक होते. त्याअनुषंगाने वाढीव मनुष्यबळ पुरवठा करणेकामी मंजूरी देण्यात येऊन वाढीव मनुष्यबळ पुरवठा करणेकामी मंजूर निविदाकारांना कार्यादेश देण्यात आला होता. सदर निविदेच्या कालावधीमध्ये ठेकेदारांना निविदेतील अटीशर्तीनुसार द्वितीय व तृतीय वर्षी देयकामध्ये ६% वाढ देण्यात आली होती.

सदर निविदेचा कालावधी संपुष्टात येत असल्याने खालील प्रमाणे मुदतवाढ देण्यात आली होती.

**तक्ता क्र. १**

| ठराव | दिनांक | मुदवाढ क्र. |
|---|---|---|
| प्रशासकीय ठराव क्र.५७८ | ०८/०३/२०२१ | १ |
| प्रशासकीय ठराव क्र.५२६ | २७/०८/२०२१ | २ |
| प्रशासकीय ठराव क्र.०२ | ०६/०४/२०२२ | ३ |
| प्रशासकीय ठराव क्र.७५ | २२/०४/२०२२ | ४ |
| प्रशासकीय ठराव क्र.३०४२ | ३१/०३/२०२३ | ५ |
| प्रशासकीय ठराव क्र.११७० | ३०/०७/२०२३ | ६ |
| प्रशासकीय ठराव क्र.१७७८ | २७/०९/२०२३ | ७ |

याकामी सदर निविदेस प्रशासकीय ठराव क्रमांक १७७८, दि.२७/०९/२०२३ रोजी अन्वये दि.३१/१२/२०२४ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. तत्पुर्वी संबंधित ठेकेदार यांनी सन २०२१-२२ व २०२२-२३ या वित्तीय वर्षात ६% भाववाढ दिली नसल्याने दिनांक १७/०५/२०२२ रोजी दोन्ही वर्षाकरिता स्वतंत्र ६% भाववाढ मिळणेबाबत पत्र दिले होते. त्याअनुषंगाने मा. अतिरीक्त आयुक्त सो (द.) यांच्या अध्यक्षतेखाली मनपाच्या निविदा समिती स्थापन करण्यात आली होती. याकामी

निविदा समितीने खालीलप्रमाणे अटी शर्ती नुसार ६% फरकाची रक्कम देणे बाबत शिफारस केली होती.

१) प्रथमत: जुलै २०२२ च्या मासिक देयकात ६% भाव वाढ देण्यात यावी. (रु.८३.१३ लक्ष)

२) तद्नंतर माहे एप्रिल -२०२२ ते जुन -२०२२ या कालावधी मधिल तीन महीन्यांचा फरक देण्याची कार्यवाही करावी. (रु.२.४० कोटी)

३) ६% वाढीनुसार सन २०२२-२३ या आर्थिक वर्षभरात येणाऱ्या रु.९.९७ कोटी रक्कमेची सुधारीत प्रशासकीय मान्यता घेण्यात यावी.

४) महापालिकेची सद्याची आर्थिक स्थिती लक्षात घेता सन २०२१-२२ या वित्तिय वर्षातील ६% फरकाची रक्कम देणेबाबत मा. स्थायी व मा. सर्वसाधारण सभेच्या निणयार्थ सादर करणेत यावे.

५) सदर कार्यवाही बाबत लेखा आक्षेप आल्यास नगरविकास विभाग शासन निर्णय दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१६ अन्वये सदरची रक्कम संबंधित ठेकेदार यांच्या मासिक देयकातुन वसुल पात्र असेल.

त्यानुसार निविदा समितीच्या शिफारसी नुसार सन २०२४-२५ या वित्तीय वर्षासाठी प्रशासकीय ठराव क्र. १५८२, दि.१४/१०/२०२४ अन्वये ६% वार्षिक वाढ देण्यात येऊन एकूण ३०% भाववाढ देण्यात आलेली आहे. याप्रमाणे सदर निविदेस पुढील प्रमाणे ६% वाढीस मान्यता दिलेली आहे.

**तक्ता क्र. २**

| अ.क्र. | ठराव | दिनांक | वित्तीय वर्ष | वार्षिक वाढ (%) |
|---|---|---|---|---|
| १ | मा.स्थायी समिती ठराव क्र.४४९ नुसार | १२/१२/२०१७ | सन २०१८-१९ | ० |
| २ | | | सन २०१९-२० | ६ |
| ३ | | | सन २०२०-२१ | १२ |
| ४ | | | सन २०२१-२२ | ० |
| ५ | प्रशासकीय ठराव क्र. ७४६ नुसार | ०८/०८/२०२२ | सन २०२२-२३ | १८ |
| ६ | प्रशासकीय ठराव क्र. २९९४ नुसार | ०९/०२/२०२४ | सन २०२३-२४ | २४ |
| ७ | प्रशासकीय ठराव क्र. १५८२ नुसार | १४/१०/२०२४ | सन २०२४-२५ | ३० |

उपरोक्त नुसार सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाकरिता संबंधित ठेकेदार यांनी त्यांचे मासिक देयकात ६% वाढीची मागणी केलेली आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे वित्तीय वर्ष २०२५-२६ च्या ६% वाढीच्या फरकासह अपेक्षित खर्चाची परिगणना होत आहे.

**तक्ता क्र. ३**

| ठेकेदाराचे नाव | झोन क्र. | मार्च-२०२५ च्या मासिक देयकाची रक्कम रु. | ६% वाढ (मार्च -२०२५ च्या देयकावर) | वार्षिक अपेक्षीत वाढीनुसार परिगणना (वित्तीय वर्ष एप्रिल २०२५ ते सप्टेंबर २०२५) (६% दरवाढी नंतर) |
|---|---|---|---|---|
| श्री.अनंत इंटरप्रायजेस | १ | १,६२,६६,२७०.०० | ७,५०,७५१.०० | ४५,०४,५०६.०० |
| उजाला लेबर कॉन्ट्रक्टर | २ | १,१७,९१,१९७.०० | ५,४४,२०९.०० | ३२,६५,२५४.०० |
| साई गणेश इंटरप्रायजेस | ३ | १,५१,२६,३६०.०० | ६,९८,१४०.०० | ४१,८८,८४०.०० |

"D:\लौकिक\पवार सर\6% वाढ\2024\Collection\6% ठराव.docx"

| ठेकेदाराचे नाव | झोन क्र. | मार्च-२०२५ च्या मासिक देयकाची रक्कम रु. | ६% वाढ (मार्च -२०२५ च्या देयकावर) | वार्षिक अपेक्षीत वाढीनुसार परिगणना (वित्तीय वर्ष एप्रिल २०२५ ते सप्टेंबर २०२५) (६% दरवाढी नंतर) |
|---|---|---|---|---|
| रेन्बो इंटरप्रायजेस | ४ | ४९,२५,९१२.०० | २,२७,३४९.०० | १३,६४,०९४.०० |
| श्री.अनंत इंटरप्रायजेस | ५ | ९७,८८,५८१.०० | ४,५१,७८१.०० | २७,१०,६८६.०० |
| दिनेश बी. संखे | ६ | ७०,९६,८१४.०० | ३,२७,५४५.०० | १९,६५,२७०.०० |
| रिलायबल एजन्सी | ७ | ४८,५३,१७७.०० | २,२३,९९३.०० | १३,४३,९५८.०० |
| हेना इंटरप्रायजेस | ८ | १,१०,५१,१२०.०० | ५,१०,०५२.०० | ३०,६०,३१२.०० |
| श्री.अनंत इंटरप्रायजेस | ९ | १,२०,८४,८०७.०० | ५,५७,७६१.०० | ३३,४६,५६६.०० |
| साई गणेश इंटरप्रायजेस | १० | ६६,१८,९१३.०० | ३,०५,४८८.०० | १८,३२,९२८.०० |
| हेना इंटरप्रायजेस | ११ | ५०,२५,९०४.०० | २,३१,९६५.०० | १३,९१,७९०.०० |
| उजाला लेबर कॉन्ट्रक्टर | १२ | ६९,७६,७१०.०० | ३,२२,००२.०० | १९,३२,०१२.०० |
| उजाला लेबर कॉन्ट्रक्टर | १३ | ७०,१७,४०६.०० | ३,२३,८८०.०० | १९,४३,२८०.०० |
| रिलायबल एजन्सी | १४ | ४१,५०,८९७.०० | १,९१,५७९.०० | ११,४९,४७४.०० |
| शिवम इंटरप्रायजेस | १५ | ६४,२१,२२५.०० | २,९६,३६४.०० | १७,७८,१८४.०० |
| साई गणेश इंटरप्रायजेस | १६ | ५६,४१,८८०.०० | २,६०,३९४.०० | १५,६२,३६४.०० |
| रिलायबल एजन्सी | १७ | २,०१,६०,९२९.०० | ९,३०,५०५.०० | ५५,८३,०३०.०० |
| मनदीप इंटरप्रायजेस | १८ | ८६,१४,३३६.०० | ३,९७,५८५.०० | २३,८५,५१०.०० |
| आर.बी.इन्फ्रा.प्रो.लि. | १९ | ५६,९२,०८०.०० | २,६२,७११.०० | १५,७६,२६६.०० |
| दिनेश बी. संखे | २० | ४०,२२,९४८.०० | १,८५,६७४.०० | ११,१४,०४४.०० |
| | **एकुण** | **१७,३३,२७,४६६.००** | **७९,९९,७२८.००** | **४,७९,९८,३६८.००** |

नागरी घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत दैनंदिन रस्तेसफाई, गटारसफाई, कचरा संकलन व क्षेपणभूमीवर वाहतूक करणेसाठीच्या नेमणूक केलेल्या ठेकेदारांना वित्तीय वर्ष एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ साठीच्या देयकावर ६% वाढ देऊन त्यानुसार येणाऱ्या एकूण **रु. ४,७९,९८,३६८/- (अक्षरी रक्कम रु. चार कोटी एकोणऐंशी लक्ष अठ्याण्णव हजार तीनशे अडुसष्ठ मात्र)** एवढा खर्च येणार आहे. सदरील खर्च हा सन २०२५-२६ या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पातील घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत अनुदानासह रस्ते, गटारे, नाले, सार्वजनिक ठिकाणे इ. साफसफाईसाठी घंटागाडी, यांत्रिक झाडू उपलब्ध करणेसह सफाई ठेका व भाड्याच्या वाहनाद्वारे यांत्रिक पद्धतीने नालेसफाई या लेखाशिर्ष अंतर्गत तरतुद रक्कम रु. २५० कोटी मधून भागविणे शक्य आहे.

तरी नागरी घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत दैनंदिन रस्तेसफाई, गटारसफाई, कचरा संकलन व क्षेपणभूमीवर वाहतूक करणेसाठीच्या नेमणूक केलेल्या ठेकेदारांना वित्तीय वर्ष एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ साठीच्या देयकावर

६% वाढ देऊन त्यानुसार येणाऱ्या एकूण **रु. ४,७९,९८,३६८/- (अक्षरी रक्कम रु. चार कोटी एकोणऐंशी लक्ष अठ्ठयाण्णव हजार तीनशे अडुसष्ठ मात्र)** या रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी पुढील प्रमाणे ठराव करण्यात येत आहे.

**प्रस्तावाचा निर्णय :** नागरी घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत दैनंदिन रस्तेसफाई, गटारसफाई, कचरा संकलन व क्षेपणभूमीवर वाहतूक करणेसाठीच्या नेमणूक केलेल्या ठेकेदारांना वित्तीय वर्ष एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ साठीच्या देयकावर ६% वाढ देऊन त्यानुसार येणाऱ्या एकूण **रु. ४,७९,९८,३६८/- (अक्षरी रक्कम रु. चार कोटी एकोणऐंशी लक्ष अठ्ठयाण्णव हजार तीनशे अडुसष्ठ मात्र)** या रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

**मनोजकुमार सुर्यवंशी (भाप्रसे)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

"D:\लौकिक\पवार सर\6% वाढ\2024\Collection\6% ठराव.docx"

# वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (प.), जि.- पालघर, पिन नं. 401 303
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

**प्रशासकीय ठराव क्र.** १४१८ | विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक : १६/१०/२०२५

**विषय :-** राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रातील कार्यरत असलेल्या आशा स्वंयसेविकांना सन २०२५ चे दिवाळी सनुग्रह अनुदान अदा करणेकामी वित्तिय व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई विरार शहर महानगरपालिका अंतर्गत कार्यक्षेत्रामध्ये राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत आशा य़ोजना राबविण्यात येते. सद्यास्थितीमध्ये वसई विरार शहर महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभाग अंतर्गत विविध नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत आशा स्वयंसेविका कार्यरत असून सामान्य नागरिकांना विविध वैद्यकीय सुविधा पुरविणेस तसेच विविध शासकीय आरोग्य योजनांचा लाभ कार्य़क्षेत्रातील गरोदर माता / बालके यांना करुन देण्यासाठी मोलाची भुमिका पार पाडत असतात.

सद्यास्थितीमध्ये वसई विरार शहर महानगरपालिका अंतर्गत एकुण ५९८ आशा स्वयंसेविका कार्यरत असुन त्यापैकी ११४ इतक्या आशा एप्रिल २०२५ पासून नियुक्त करण्यात आल्या आहेत. वसई विरार शहर महानगरपालिका व्दारे प्रति महिना आशांना रु.४५००/-, रु. ३५००/- व रु. २०००/- अशा पध्दातीने सेवाजेष्ठतेनुसार प्रतिमाह मानधन अदा केले जाते. त्यांना मिळणारा मोबदला अल्प असुन त्यावर त्यांचा उदरनिर्वाह होवू शकत नाही. आता दिवाळीचा सण जवळ आला आहे. आशा स्वंयसेविकाची प्राप्ती कमी असल्यामुळे त्या आपला दिवाळी सण साजरा करू शकत नाहीत.

महाराष्ट्र राज्य आशा गटप्रवर्तक व आशा स्वयंसेविका संघातर्फे प्राप्त झालेल्या प्रत्रानुसार महानगरपालिकेत कार्यरत आशा स्वयंसेविकांना त्यांच्या एकुण वार्षिक मोबदल्याच्या सरासरी एक महिन्याच्या मोबदल्याएवढे किंवा वार्षिक प्राप्तीच्या ८.३३ टक्के बोनस / सानुग्रह अनुदान देण्यात यावा. तसेच देशांतील सर्व छोट्या मोठ्या व्यवसायातील कर्मचारी वर्गाला किमान वार्षिक उत्पान्नाच्या ८.३३ टक्के बोनस दिला जातो. नवी मुंबई महानगरपालिका आशा स्वयंसेविकांना रु. १८००० देण्यात येतो. अशी मागणी केलेली आहे.

गतवर्षी महानगरपालिकेने प्रति आशा रु. ५०००/- एवढा बोनस/दिवाळी सानुग्रह अनुदान देण्यात आला होता. त्यानुसार यंदाही रु. ५०००/- इतके सानुग्रह अनुदान देणे आवश्यक वाटते.

सद्यस्थितीत ४४० आशा स्वंयसेविकांना रु. ५०००/- दिवाळी सानुग्रह अनुदान दिल्यास रु. २२,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. सन २०२५-२६ मधील **महानगरपालिका कर्मचारी वर्गास बक्षीस/सानुग्रह अनुदान/बोनस** या लेखाशिर्षातील तरतुदीमधून रक्कम २२,००,०००/- महानगरपालिकेच्या निधीतून खर्च करणेस वित्तिय व प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे.

**ठराव** :- राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रातील कार्यरत असलेल्या ४४० आशा स्वंयसेविकांना सन २०२५ चे सानुग्रह अनुदानासाठी येणारा खर्च रु. २२,०२,०००/- (अक्षरी बावीस लक्ष पाच हजार रुपये मात्र) इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

मनोजकुमार सुर्यवंशी (भा.प्र.से.)
आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (प.), जि. - पालघर, पिन नं. 401 303

दुरध्वनी - 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स - 0250-2525107,

ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com


---

**प्रशासकीय ठराव क्र.** १४१८ — विभाग :- सार्व. बांधकाम

दिनांक :- १६/१०/2025

---

**प्रस्तावाचा विषय** :- वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत देखभाल दुरुस्तीकरीता असलेले रस्ते महापालिकेकडे हस्तांतरीत करून घेणेकामी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर** :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत देखभाल दुरुस्ती करीता असलेल्या रस्त्याचे हस्तांतरण करणे बाबतचा प्रस्ताव दि.०८/०५/२०२५ अन्वये कार्यकारी अभियंता, सा. बां विभाग (पालघर), महाराष्ट्र शासन यांचेकडे सादर करण्यात आला आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील रस्ते सार्वजनिक बांधकाम वसई, (सा.बां) उपविभाग क्र. १, वसई यांच्यामार्फत देखभाल दुरुस्ती करण्यात येत आहे. सदर रस्त्यांच्या चौपदरीकरणाचे व कॉक्रीटीकरणाची कामे मुंबई महानगर विकास प्राधिकरणामार्फत प्रस्तावित करण्यात आली आहेत, याबाबतची पुढील कार्यवाही वसई विरार शहर महानगरपालिकडून सुरु आहे.

वसई विरार शहर महानगरपलिका क्षेत्रातील नागरिकांना पाणी पुरवठा करणे तसेच, नैसर्गीक पाणी निचरा, सांडपाणी व मल:निसारण इत्यादी बाबींकरीता गटार व मलजलवाहिन्या इत्यादी सुविधा महापालिकेमार्फत पुरविण्यात येत आहेत. तसेच मंजूर विकास आराखड्याप्रमाणे जागा विकसित करणे तसेच वेळोवेळी रस्त्यांची देखभाल दुरूस्तीची कामे महापालिकेमार्फत करण्यात येतात. काही ठिकाणी रस्ता दुरूस्तीची कामे प्रगतीपथावर आहेत.

सदर रस्त्यावर पायाभूत सुविधासाठी कोणतीही कामे करावयाची झाल्यास त्यासाठी सा.बां. बांधकाम विभागाची परवानगी घ्यावी लागत आहे. परवानगी घेणेस विलंब होत असल्यामुळे नागरिकांना वेळेत सेवा देणे शक्य होत नाही. करिता " महापालिका क्षेत्रातील आगाशी -विरार-शिरसाड-अंबाडी रस्ता (रा. मा.८१) कि. मी. ०/०० ते २०/०५०" रस्ता महानगरपालिकेकडे हस्तांतरण करणे आवश्यक आहे.

वरील प्रमाणे वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील सार्वजनिक बांधकाम विभाग (पालघर), महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारीत असलेला रस्ता महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्याच्या दृष्टीने रु.१००/- च्या मुद्रांक पेपरवर खालील अटी-शर्ती नमूद करून हमीपत्र सादर करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर यांनी दि.२५/०९/२०२५ रोजीच्या पत्राने महापालिकेस कळविले आहे.

१. सदरच्या रस्त्यालगतच्या बांधकामास महानगरपालिकेकडून परवानगी देताना महाराष्ट्र शासनाने नोव्हेंबर २०१३ ला मंजूर केलेल्या अ, ब, क नगरपालिका नियमावलीनुसार व नगरविकास विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या प्रचलित शासन निर्णयानुसार योग्य अंतरे ठेऊन परवानगी देण्यात येईल.

२. सदरच्या रस्त्यावर अतिक्रमणे होणार नाहीत याची दक्षता वसई-विरार शहर महानगरपालिकेकडून घेण्यात येईल.

३. सदरच्या रस्त्याची देखभाल व दुरूस्ती योग्य प्रकारे करून तो वाहतुकीस योग्य ठेवण्यात येईल.

वरील नमुद शर्ती अंतर्भुत करून रु.५००/- च्या मुद्रांक स्वाक्षांकीत करून हमीपत्र सा.बां. विभाग (पालघर), महाराष्ट्र शासन यांचेकडे सादर करण्यात आले आहे. या बाबतचा ठराव पारित करून सादर करण्याबाबत सहाय्यक अभियंता सा.बां. उपविभाग क्र.१ वसई यांनी दि.०७/१०/२०२५ रोजीच्या पत्राने महानगरपालिकेस कळविले आहे.

विभागाचे अभिप्राय :

१. सा.बां. उपविभाग क्र.१ वसई/ सा. बां विभाग (पालघर), महाराष्ट्र शासनामार्फत उक्त रस्त्यावर भुमीगत गॅस वाहिन्या अंथरणेकामी मे. गुजरात गॅस लि. यांना परवानगी देण्यात आली आहे. त्यानुसार त्यांनी विरार फाटा ते बोळींज बाह्यवळण रस्त्यापर्यंत खोदाई केली आहे.

२. सदर रस्ता आजपावेतो नादुरूस्त अवस्थेत असून सदर रस्ता दुरूस्तीची जाबाबदारी सा.बां. उपविभाग क्र.१ वसई यांची राहणार आहे.

३. मे. गुजरात गॅस लि. तसेच अन्य भुमीगत प्रणालीव्दारे सेवा पुरविणाऱ्या संस्थांना रस्ता खोदाईकरीता देण्यात आलेल्या परवानगीच्या अनुषंगाने सदर रस्ता प्रथम सा.बां. उपविभाग क्र.१ वसई यांनी दुरूस्ती करून देणे आवश्यक आहे.

४. वरील प्रमाणे कार्यवाही केल्यानंतर " महापालिका क्षेत्रातील आगाशी -विरार-शिरसाड-अंबाडी रस्ता (रा. मा.८१) कि. मी. ०/०० ते २०/०५०" महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करून घेण्यास हरकत नाही.

तरी मे. गुजरात गॅस लि. किंवा अन्य भुमीगत सेवा देणाऱ्या संस्थांना सा.बां. उपविभाग क्र.१ वसई, महाराष्ट्र शासनामार्फत रस्ते खोदाई करीता परवानगी दिली असल्यास सदरचे रस्ते सा.बां. विभागाने दुरूस्ती करून दिल्यानंतर " महापालिका क्षेत्रातील आगाशी -विरार-शिरसाड-अंबाडी रस्ता (रा. मा.८१) कि. मी. ०/०० ते २०/०५०" हा रस्ता वसई-विरार शहर महानगरपालिकेकडे कायमस्वरूपी हस्तांतरीत करून घेण्याकामी प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेस्तव मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्यापुढे सादर.

---

**ठराव :-**

१. वसई-विरार शहर महानगपालिका क्षेत्रातील सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन तसेच जिल्हा परिषद पालघर यांच्या मालकीचे असलेले सर्व रस्ते महानगरपालिकेकडे निहित असणे आवश्यक आहे. मात्र याबाबतची कार्यवाही न झाल्याने लोकहितार्थ कामे करण्याच्या दृष्टीने अडचणी येत आहेत.

२. सद्य:स्थितीत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीच्या रस्त्यांपैकी काही रस्ते महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झाले असून "महापालिका क्षेत्रातील आगाशी -विरार-शिरसाड-अंबाडी रस्ता (रा. मा.८१) कि. मी. ०/०० ते २०/०५०" हा रस्ता महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झाला नव्हता. सदर रस्ता महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्याकरीता पत्रव्यवहार केला असता सा.बां. विभागाने रस्ता हस्तांतरणाची सहमती दर्शविली आहे.

३. सा.बां. विभागामार्फत " महापालिका क्षेत्रातील आगाशी -विरार-शिरसाड-अंबाडी रस्ता (रा. मा.८१) कि. मी. ०/०० ते २०/०५०" या रस्त्यावर मे. गुजरात गॅस लि. व अन्य भूमीगत सेवा पुरविणाऱ्या संस्थांना रस्ता खोदाईची परवानगी दिली असल्यास सदरचे रस्ते सा.बां. विभागाने दुरूस्ती करून दिल्यानंतर सदर रस्ता कायमस्वरूपी महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करून घेण्यास महानगरपालिकेची प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

४. सदर रस्ता देखभाल दुरूस्तीच्या अनुषंगाने आवश्यक ती तरतुद पुढील प्रत्येक अर्थसंकल्पात बांधकाम विभागाने करण्याची दक्षता घ्यावी.

मनोजकुमार सुर्यवंशी (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

P/359

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पश्चिम), ता. वसई, जि. पालघर, पिन नं. ४०१३०३.
दुरध्वनी :- ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६ फॅक्स :- ०२५०-२५२५१०७
ई-मेल :- vasaivirarcorporation@yahoo.com

**प्रशासकीय ठराव क्र.** १४२०

**विभाग:- घनकचरा व्यवस्थापन**
**दिनांक:-** १६/१० **/२०२५**

**प्रस्तावाचा विषय :-** **मे. श्री अनंत एंटरप्रायझेस यांची सुरक्षा अनामत रक्कमेतून सफाई कर्मचारी यांना सानुग्रह अनुदान (बोनस) अदा करणेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर:-** घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत कचरा संकलन, रस्ते सफाई, गटार सफाई इ. कामासाठी नऊ प्रभाग निहाय २० झोन तयार करून शासनाच्या किमान वेतन कायद्यानुसार दैनंदिन रस्ते सफाई कामासाठी मनपास मनुष्यबळ पुरविणे व इतर साधन सामुग्री पुरवठा करण्याचा अभिकर्त्यांना २०१७-१८ च्या निविदेनुसार त्रैवार्षिक ठेका देण्यात आलेला आहे. तसेच महानगरपालिकेमार्फत A ते I प्रभाग समितीमध्ये एकुण ३३९७ सफाई कर्मचाऱ्यांची ठेका तत्त्वावर मंजूर अभिकर्त्यांमार्फत दैनंदिन साफसफाईच्या कामासाठी नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यानुसार ठेकेदारांमार्फत नियुक्त कामगार यांना शासनाच्या किमान वेतन कायद्यान्वये मासिक वेतन अदा करण्यात येते. त्यामध्ये पी.एफ समाविष्ट आहे. त्यानुसार मे. श्री. अनंत एंटरप्रायझेस यांना दि. ३०/०१/२०१८ रोजी करारनामा करुन दि.२८/०२/२०१९ रोजी कार्यादेश देण्यात आलेला आहे.

तथापि, मे. श्री. अनंत एंटरप्रायझेस यांना नेमून दिलेल्या प्रभागामध्ये स्वच्छता होत नसल्याबाबत त्यांना वारंवार कल्पना देऊन, पत्र देऊन तसेच नोटीस बजावून देखील त्यांचे कामामध्ये सुधारणा होत नसून त्यांना सदर कामाचे गांभिर्य नसल्याचे दिसून येत आहे. तसेच यापुर्वीही सदर ठेकेदारा संबंधित स्वच्छतेबाबत, कर्मचाऱ्याच्या वेतनाबाबत, संरक्षण साहित्यांचा पुरवठा न केल्याबाबत वारंवार तक्रारी प्राप्त होत होत्या. परंतु दैनंदिन रस्ते सफाई, गटर सफाई हे काम अत्यावश्यक सेवेमध्ये मोडत असल्यामुळे त्याचा प्रभागातील साफसफाई तसचे नागरिकांच्या आरोग्याबाबत कोणत्याही समस्या उद्भवू नये याकरिता मनपाने ठेकेदारास योग्य ती समज देऊन काम करण्याची मुभा दिली.

परंतु, मे. श्री अनंत एंटरप्रायझेस हे प्रभागमध्ये करत असलेल्या साफसफाईच्या कामांबाबत नागरिकांच्या, पदाधिकाऱ्यांच्या तसेच विविध संघटनांच्या तक्रारी दुरध्वनी, तसेच मुख्यालयात मा.आयुक्त सो., अतिरिक्त आयुक्त व उपायुक्त, घनकचरा व्यवस्थापन विभाग यांना प्रत्यक्ष भेटून प्राप्त होत आहेत. प्रभागातील स्वच्छता निरीक्षक यांच्या खुलासामध्ये मे. श्री अनंत एंटरप्रायझेस हे परिसर स्वच्छ करीत नसल्याबाबत स्पष्ट दिसुन येते. तसेच सदर ठेकेदार त्यांच्या अधिनस्त काम करणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांना मासिक वेतन वेळेवर अदा करत नसल्याबाबत व संरक्षण साहित्य पुरवठा करत नसल्याबाबत स्थानिक संघटना आंदोलने करतात व मनपास वेठीस धरुन मनपाची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे अश्या ठेकेदारांना वारंवार संधी देऊन देखील

P/361

कामात सुधारणा होत नसल्यामुळे सदर ठेकेदार यांनी निविदेतील अटी शर्तींचे उल्लंघन केल्याप्रकरणी Termination of contract due to event of default अन्वये त्यांना दि.१९/०९/२०२५ रोजीच्या प्रशासकीय ठराव क्र. १२८७ अन्वये मान्यता घेऊन त्यांचा ठेका रद्द करुन त्यांना या कार्यालयातील जा. क्र. वविशम/घकव्य/१४८५/२०२५, दि.१९/०९/२०२५ रोजी वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात ३ वर्षासाठी काळ्या यादीत टाकण्यात आलेले आहे.

परंतु, मे. श्री अनंत एंटरप्रायझेस हे काम करत असलेल्या प्रभाग समितीमध्ये साफसफाईचे काम करणेसाठी पर्यायी व्यवस्था म्हणून दुसऱ्या ठेकेदारांची दि.२३/०९/२०२५ रोजी नेमणूक करणेत आलेली आहे. त्यामुळे मे. श्री अनंत एंटरप्रायझेसचे सफाई कर्मचारी त्यांचे जागी नेमणूक केलेल्या ठेकेदाराकडे दि.२३/०९/२०२५ रोजीपासून वर्ग करणेत आलेले आहेत. त्यामुळे सदर सफाई कर्मचारी यांचे माहे सप्टेंबर २०२५ चे दि. २३/०९/२०२५ रोजी पर्यंतचे मासिक वेतन हे मे. श्री अनंत एंटरप्रायझेस यांनी अदा करणे, बंधनकारक आहे. तसेच सदर कर्मचाऱ्यांना देण्यात येणारे सानुग्रह अनुदान (बोनस) ची रक्कम वेळोवेळी मे. श्री अनंत एंटरप्रायझेस यांना अदा केलेली आहे. तथापि, सदर ठेकेदार मे. श्री अनंत एंटरप्रायझेस यांनी कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन व बोनस या विषयाबाबत मा. उपायुक्त, घनकचरा व्यवस्थापन विभाग यांची दि.०९/१०/२०२५ रोजी व दि. १३/१०/२०२५ रोजी भेट घेतली. सदर भेटीअंती कर्मचाऱ्यांचे माहे सप्टेंबरचे वेतन मे. श्री अनंत एंटरप्रायझेस करतील व बोनसची रक्कम मनपा फंडात त्यांच्या जमा असलेल्या सुरक्षा अनामत रक्कमेतून नविन नियुक्त ठेकेदारांच्या खात्यामध्ये जमा करुन कर्मचाऱ्यांना बोनस अदा करणेबाबत सहमती दर्शविली.

त्यानुसार प्रभाग समिती ए मधील झोन क्र.१, प्रभाग समिती सी मधील झोन क्र.५ व प्रभाग समिती ई मधील झोन क्र. ९ मधील सुरक्षा अनामत रक्कमेचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**तक्ता क्र. ०१**

| अ.क. | प्रभाग समिती | झोन क्र. | सुरक्षा अनामत रक्कम |
|---|---|---|---|
| १ | ए | १ | रु. १,३७,६८,१०५/- |
| २ | सी | ५ | रु. ८२,८१,४७८/- |
| ३ | ई | ९ | रु. १,०२,२७,२९५/- |

वरील नमूद मे. श्री अनंत एंटरप्रायझेस यांची सुरक्षा अनामत रक्कम मनपाकडे जमा असून सदरील सुरक्षा अनामत रक्कमेमधून वरील झोन मधील सफाई कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान (बोनस) देणे योग्य वाटते. ते दिल्यास खालीलप्रमाणे खर्च होऊ शकतो.

**तक्ता क्र. ०२**

| अ. क. | प्रभाग समिती | झोन क्र. | सुरक्षा अनामत रक्कम | सानुग्रह अनुदान (बोनस) रक्कम | सानुग्रह अनुदान (बोनस) वगळून सुरक्षा अनामत शिल्लक रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ए | १ | रु. १,३७,६८,१०५/- | रु. ६३,६०,९७३/- | रु. ७४,०७,१३२/- | माहे ऑक्टो. २०२४ ते सप्टें. २०२५ |
| २ | सी | ५ | रु. ८२,८१,४७८/- | रु. ३९,२७,७२७/- | रु. ४३,५३,७५१/- | माहे ऑक्टो. २०२४ ते सप्टें. २०२५ |
| ३ | ई | ९ | रु. १,०२,२७,२९५/- | रु. ३९,९१,३७१/- | रु. ६२,३५,९२४/- | माहे ऑक्टो. २०२४ ते जुलै २०२५ |
| **एकुण** | | | **रु.३,२२,७६,८७८/-** | **रु.१,४२,८०,०७१/-** | **रु. १,७९,९६,८०७/-** | |

मे. श्री अनंत एंटरप्रायझेस यांची झोन क्र. १, ५ व ९ मध्ये सुरक्षा अनामत **रक्कम रु. ३,२२,७६,८७८/-** (अक्षरी रक्कम रु. तीन कोटी बावीस लक्ष शहात्तर हजार आठशे अठ्ठ्याहत्तर मात्र) एवढी होत असून सानुग्रह अनुदान (बोनस) **रक्कम रु. १,४२,८०,०७१/-** (अक्षरी रक्कम रु. एक कोटी बेचाळीस लक्ष ऐंशी हजार एक्काहत्तर मात्र) तसेच सानुग्रह अनुदान (बोनस) वगळून सुरक्षा अनामत शिल्लक **रक्कम रु. १,७९,९६,८०७/-** (अक्षरी रक्कम रु. एक कोटी एकोणऐंशी लक्ष शहाण्णव हजार आठशे सात मात्र) एवढी रक्कम मनपा फंडात जमा राहील. तथापि, मे. दिनेश बी. संखे यांनी प्रभाग समिती ई, झोन नं. ९ मध्ये माहे ऑगस्टचे वेतन **रक्कम रु. ४६,२४,२५८/-** इतकी अदा केली आहे. त्यामुळे सदर महिन्याची बोनसची **रक्कम रु. ४,११,८४०/-** मे. दिनेश बी. संखे यांच्या खात्यामध्ये मनपा फंडातून जमा करणे आवश्यक आहे. तसेच दि.२३/०९/२०२५ रोजीच्या कार्यदेशानुसार प्रभाग समिती "ए" झोन क्र. १ मध्ये मे. मेनदीप इंटरप्रायजेस, प्रभाग समिती "सी" झोन क्र. ५ मध्ये मे. हेना इंटरप्रायझेस व प्रभाग समिती "ई" झोन क्र. ९ मध्ये मे. दिनेश बी. संखे यांची नव्याने नियुक्ती करण्यात आली. सदर ठेकेदार यांनी दि. २४/०९/२०२५ रोजी पासून ते दि. ३०/०९/२०२५ रोजी पर्यंत प्रभाग समितींमध्ये दैनंदिन रस्ते सफाई, गटार सफाई, कचरा संकलन करणे इ. कामे कर्मचाऱ्यांमार्फत करुन घेतलेली आहेत. त्यामुळे सदरचे वेतन प्रभाग समिती "ए" झोन क्र. १ मध्ये मे. मेनदीप इंटरप्रायजेस, प्रभाग समिती "सी" झोन क्र. ५ मध्ये मे. हेना इंटरप्रायझेस व प्रभाग समिती "ई" झोन क्र. ९ मध्ये मे. दिनेश बी. संखे यांनी कर्मचाऱ्यांच्या खात्यामध्ये अदा केलेले आहे. त्यामुळे सदर सात दिवसाची कर्मचाऱ्यांना अदा करावयाची बोनसची रक्कम खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र. ०३**

| अ.क. | प्रभाग समिती | झोन क्र. | ठेकेदाराचे नाव | ७ दिवसांची सानुग्रह अनुदान (बोनस) रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | ए | १ | मे. मेनदीप इंटरप्रायजेस | रु. १,४४,१४४/- |
| २ | सी | ५ | मे. हेना इंटरप्रायझेस | रु. ९६,०९६/- |
| ३ | ई | ९ | मे. दिनेश बी. संखे | रु. १,१०,८४०/- |
| **एकुण** | | | | **रु. ३,५१,०८०/-** |

P/865

तथापि, मे. श्री अनंत एंटरप्रायझेस यांनी कर्मचाऱ्यांचे माहे सप्टेंबर २०२५ चे वेतन दि. २३/१०/२०२५ रोजी पर्यंत अदा कलेले आहे. त्यामुळे उपरोक्त ७ दिवसाच्या बोनसची रक्कम मनपा मार्फत त्यांना अदा करणेत आलेली नाही. तरी, उपरोक्त तक्त्यामधील बोनसची एकुण रक्कम रु. ३,५१,०८०/- नव्याने नियुक्त ठेकेदार यांना मनपा फंडातून अदा करणे आवश्यक आहे.

तरी, मे. श्री अनंत एंटरप्रायझेस यांच्या सुरक्षा अनामत **रक्कम रु.३,२२,७६,८७८/-** मधून वरील नमूद झोन मधील सफाई कर्मचारी यांना सानुग्रह अनुदान (बोनस) देणेकामी नव्याने नेमणूक केलेले प्रभाग समिती "ए" झोन क्र. १ मध्ये मे.मेनदीप इंटरप्रायजेस यांना **रक्कम रु. ६३,६०,९७३/-**, प्रभाग समिती "सी" झोन क्र. ५ मध्ये मे. हेना इंटरप्रायझेस यांना **रक्कम रु. ३९,२७,७२७/-** व प्रभाग समिती "ई" झोन क्र. ९ मध्ये मे. दिनेश बी. संखे यांना **रक्कम रु. ३९,९१,३७१/-** अदा करणे आवश्यक आहे.

तसेच मे. दिनेश बी. संखे यांनी प्रभाग समिती ई मधील झोन क्र. ९ मधील कामगारांचे माहे ऑगस्ट २०२५ चे वेतन अदा केले असल्याने सदर महिन्याची बोनसची **रक्कम रु. ४,११,८४०/-** मनपा फंडातून अदा करणे आवश्यक आहे. तसचे नविन आदेशाप्रमाणे दि. २४/०९/२०२५ रोजी पासून ते दि. ३०/०९/२०२५ रोजी पर्यंत काम केलेल्या कर्मचाऱ्यांना सात दिवसांच्या बोनसची **रक्कम रु. ३,५१,०८०/-** एवढी तक्ता क्र. ०३ नुसार नव्याने नियुक्त ठेकेदार यांना मनपा फंडातून देणेकामी पुढीलप्रमाणे ठराव करण्यात येत आहे.

**प्रस्तावाचा निर्णय :** **१.** वरील नमूद झोन मधील सफाई कर्मचारी यांना सानुग्रह अनुदान (बोनस) देणेकामी नव्याने नेमणूक केलेले प्रभाग समिती "ए" झोन क्र. १ मध्ये मे.मेनदीप इंटरप्रायजेस यांना **रक्कम रु. ६३,६०,९७३/-**, प्रभाग समिती "सी" झोन क्र. ५ मध्ये मे. हेना इंटरप्रायझेस यांना **रक्कम रु. ३९,२७,७२७/-** व प्रभाग समिती "ई" झोन क्र. ९ मध्ये मे. दिनेश बी. संखे यांना **रक्कम रु. ३९,९१,३७१/-** अदा करणे आवश्यक आहे. तसेच मे.श्री अनंत एंटरप्रायझेस यांच्या सुरक्षा अनामत **रक्कम रु.३,२२,७६,८७८/-** मधून रक्कम रू.१,४२,८०,०७१/- (अक्षरी रक्कम रू. एक कोटी बेचाळीस लक्ष ऐंशी हजार एकाहत्तर मात्र) एवढी रक्कम कपात करून झोन क्र. १ मधिल मे.मेनदीप इंटरप्रायजेस, झोन क्र. ५ मधिल मे. हेना इंटरप्रायझेस व झोन क्र. ९ मधिल मे. दिनेश बी. संखे यांना अदा करणेस मान्यता देत आहे.

२. मे. दिनेश बी. संखे यांनी प्रभाग समिती ई मधील झोन क्र. ९ मधील कामगारांचे माहे ऑगस्ट २०२५ चे वेतन अदा केले असल्याने सदर महिन्याची बोनसची **रक्कम रु.४,११,८४०/-** मनपा फंडातून मे. दिनेश बी. संखे यांना अदा करणेस मान्यता देण्यात येत आहे.

३. तसचे नविन आदेशाप्रमाणे दि. २४/०९/२०२५ रोजी पासून ते दि. ३०/०९/२०२५ रोजी पर्यंत काम केलेल्या कर्मचाऱ्यांना सात दिवसांच्या बोनसची रक्कम नव्याने नियुक्त ठेकेदार झोन क्र. १ मधिल मे.मेनदीप इंटरप्रायजेस यांना रक्कम रु. १,४४,१४४/-, झोन क्र. ५ मधिल मे. हेना इंटरप्रायझेस यांना रक्कम रु. ९६,०९६/- व झोन क्र. ९ मधिल मे. दिनेश बी. संखे यांना रक्कम रु. १,१०,८४०/- असे एकूण **रक्कम रु. ३,५१,०८०/-** एवढी मनपा फंडातून अदा करणेस मान्यता देत आहे.

**मनोजकुमार सुर्यवंशी** (भाप्रसे)
**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

# वसई-विरार शहर महानगरपालिका
# मुख्य कार्यालय, विरार

**प्रशासकीय ठराव क्र. :-** १४२१

**विभाग :- घनकचरा व्यवस्थापन**
**दिनांक :-** १६/१०/**२०२५**

---

**प्रस्तावाचा विषय:-** "स्वच्छता ही सेवा २०२५ अभियान", दि.१७/०९/२०२५ ते दि.०२/१०/२०२५ रोजीपर्यंत पंधरवडा राबविणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर:-** राष्ट्रपिता "महात्मा गाधी जयंती" निमित्त आदरांजली अपर्ण करण्यासाठी ०२ ऑक्टोबर हा दिवस स्वच्छ भारत दिवस म्हणून साजरा केला जातो. त्याची पूर्वतयारी म्हणून, स्वच्छ भारतासाठी स्वयंप्रेरणा आणि सामूहिक कृतीला बळकटी देण्यासाठी २०१७ पासून बार्षिक स्वच्छता ही सेवा (SHS) पंधरवडा साजरा केला जात आहे. दि. १७ सप्टेंबर, २०२५ ते दि.०२ ऑक्टोबर, २०२५ दरम्यान स्वच्छता ही सेवा (SHS) पंधरवडा आयोजित करण्यात आला असून दरवर्षीप्रमाणे या वर्षीही "स्वच्छ उत्सव" हे अभियान राबविण्यात येणार आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**स्वच्छता ही सेवा (SHS) २०२५ अभियानाचे उद्दिष्टे —**

मोठ्या प्रमाणावर गलिच्छ व अस्वच्छ ठिकाणे साफ करण्यासाठी स्वच्छता मोहिम राबविणे. या मोहिमेस नागरिकांचे समर्थन व सहभाग, स्वच्छता कामगारांच्या योगदानाची ओळख, भारतातील स्वच्छता आणि शाश्वत कचरा व्यवस्थापनाच्या भविष्यासाठी वचनबद्धतेची पुष्टी करणे.

❖ **स्वच्छता ही सेवा (SHS) २०२५ अभियानाची प्रमुख उपक्रमे खालीलप्रमाणे आहेत.**

अ) Cleanliness Target Units (CTUs ) चे मॅपिंग व सुशोभिकरण करणे.
ब) सार्वजनिक जागा स्वच्छ करणे.
क) सफाई मित्र सुरक्षा शिबिर.
ड) स्वच्छ हरित उत्सव.
ई) स्वच्छता अभियानाचा पूरस्कार. (Advocacy for Swachhata)

**अ) Cleanliness Target Units (CTUs) स्वच्छता लक्ष्य युनिटचे मॅपिंग व सुशोभिकरण करणे:-**

- खालील उपक्रम लोकसहभाग, जनजागृती करून राबविणे.
- CTUs Black Spot-दुर्लक्षित केलेले कचऱ्याचे ठिकाण, ज्या ठिकाणी स्वच्छता करणे शक्य नाही तसेच पर्यावरण व आरोग्याला धोकादायक असलेल्या ठिकाणांची स्वच्छता करणे.
- CTUs हे स्वच्छता पोर्टलवर मॅपिंग करणे तसेच सदर CTUs महिला बचत गट, स्वयंसेवी संस्था (NGO) यांचे मार्फत सफाई करुन घेणे, Adoption करणे.
- Low Intensity- ७ दिवसात साफ सफाई करणे.

- Medium Intensity- ३० दिवसात साफ सफाई करणे.
- High Intensity- ३० दिवसापेक्षा जास्त दिवसात साफ सफाई करणे.

**ब) सार्वजनिक जागा स्वच्छ करणे:-**

- नागरिकांच्या सहभाग व भागिदारीसह स्वच्छता मोहिम राबविणे.
- कार्यालये आणि संस्थात्मक इमारती, व्यावसायिक आणि बाजार क्षेत्र, शैक्षणिक संस्था, सार्वजनिक वाहतूक केंद्र, प्रमुख रस्ते आणि महामार्ग, रेल्वे ट्रॅक, अभयारण्ये, प्राणीसंग्रहालय क्षेत्र, ट्रेकिंग आणि कॅम्पिंग साइट, जलकुंभ आणि नाले, पर्यटन स्थळे, धार्मिक आणि आध्यात्मिक ठिकाणांची साफसफाई करणे.

**क) सफाई मित्र सुरक्षा शिबिर**

- सफाई मित्रांसाठी आरोग्य शिबिर व कल्याणकारी योजनांचा लाभ देणे.

**ड) स्वच्छ हरित उत्सव**

- इको फ्रेन्डली व शुन्य कचरा उत्सव/ सण साजरा करणे.

**ई) स्वच्छता अभियानाचा पूरस्कार (Advocacy foe Swachhata)**

- स्वच्छ सुजल गाव, टाकाऊ पासुन टिकाऊ वस्तू तयार करणे, RRR Centre (Reduce, Reuse and Recycle)

त्याअनुषंगाने स्वच्छता ही सेवा (SHS) २०२५ अभियानाचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र.३**

| अ.क्र. | दिनांक | मुख्य मोहिम | उप मोहिम | ठिकाणे | करावयाची कार्यवाही |
|---|---|---|---|---|---|
| १ | १७ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर २०२५ | Cleanliness Target Units (CTUs) स्वच्छता लक्ष्य युनिटचे मॅपिंग व सुशोभिकरण करणे. | CTUs Black Spot-दुर्लक्षित केलेले कचऱ्याचे ठिकाण, ज्या ठिकाणी स्वच्छता शक्य नाही तसेच पर्यावरण व आरोग्याला धोकादायक अशा ठिकाणांची स्वच्छता करणे. CTUs स्वच्छता पोर्टलवर मॅपिंग करणे तसेच सदर CTUs महिला बचत गट, स्वयंसेवी संस्था (NGO) यांचे मार्फत सफाई करुन घेणे, (Adoption) करणे. Low Intensity- ७ दिवसात साफ सफाई करणे. Medium Intensity- ३० दिवसात साफ सफाई करणे. High Intensity- ३० दिवसापेक्षा जास्त दिवसात साफ सफाई करणे. | सार्वजनिक ठिकाणी | स्वच्छता मोहिम राबविणे. |
| २ | २० सप्टेंबर २०२५ | सागरी किनारपट्टी स्वच्छता मोहिम | आंतरराष्ट्रीय किनारपट्टी स्वच्छता दिवस निमित्त स्वच्छता मोहिम, एक पेड माँ केनाम मोहिम व पथनाट्य आयोजित करणे. | सुरुची बिच | १.स्वच्छता मोहिम राबविणे. २. वृक्षरोपण करणे. ३. पथनाट्य सादरीकरण. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३. | २६ सप्टेंबर २०२५ | सार्वजनिक जागा स्वच्छ करणे. | सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता करणे | पर्यटण स्थळ, धार्मिक स्थळ, रस्ते, दुभाजक, रेल्वे पब्लिक ब्रिज, स्कायवॉक्स व आजूबाजूचा परिसर इ. स्वच्छ करणे. (ए ते आय प्रभाग समिती) | स्वच्छता मोहिम राबविणे. |
| ४ | २६ ते २९ सप्टेंबर २०२५ | सफाई मित्र सुरक्षा शिबीर | सफाई कर्मचारी व त्यांच्या कुटूंबीयांसाठी सामाजिक कल्याण योजनेचा लाभ मिळवून देणेकरिता विशेष शिबीर आयोजित करणे. (योजना:- लाडकी बहिण, आधार कार्ड, स्वच्छ भारत मिशन अंतर्गत वैयक्तिक घरगुती शौचालय - IHHL Scheme चे फॉर्म भरून घेणे) तसेच आरोग्य शिबिर आयोजित करणे. | प्रभाग समिती ए ते आय मधील नागरी आरोग्य प्राथमिक केंद्र/ रुग्णालय, दवाखाने/आयुष्यमान आरोग्य मंदीर/माता बाळसंगोपन केंद्र | सामाजिक कल्याणकारी योजना व आरोग्य शिबिर आयोजित करणे. |
| ५ | ३० सप्टेंबर २०२५ | स्वच्छ हरित उत्सव | टाकाऊ पासून टिकाऊ वस्तूंच्या कलाकृतीचे प्रदर्शन | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्र | प्रदर्शन आयोजित करणे. |
| ६ | ३० सप्टेंबर २०२५ | स्वच्छता अभियानाचा पूरस्कार (Advocacy for Swachhata) | RRR Centre (Reduce, Reuse and Recycle) | प्रभाग समिती ए | RRR Centre ची साफसफाई करणे व जनजागृती करणे. |

दि.३०/०९/२०२५ रोजी स्वच्छ हरित उत्सव व स्वच्छता अभियानाचा पूरस्कार (Advocacy for Swachhata) अंतर्गत इको फ्रेन्डली वस्तू (उदा.कंदील, दिवाळी व नवरात्री निमित्त वस्तू), टाकाऊ पासुन टिकाऊ वस्तूंची स्पर्धा आयोजित करावयाची आहे. सदर स्पर्धेतील वस्तुंचे प्रदर्शन (Waste to Art) आयोजित करणेकरिता शाळा व महाविद्यालय विद्यार्थ्यांना स्पर्धेतील वयोमर्यादेनुसार इयत्ता ५ वी ते १० वी (प्रथम, द्वितीय, तृतीय,उत्तेजनार्थ बक्षीस), इयत्ता ११ वी व १२ वी (प्रथम, द्वितीय, तृतीय,उत्तेजनार्थ बक्षीस), F.Y ते पदवीधर (Bachelor's ते Master डिग्री पर्यंत) (प्रथम, द्वितीय, तृतीय,उत्तेजनार्थ बक्षीस) असे एकुण १२ बक्षीस वितरण करणे आवश्यक आहे. सदरील स्पर्धेतील बक्षीसांकरिता होणारा अंदाजित **रक्कम रुपये ५१,०००/- (अक्षरी एकावन्न हजार मात्र) इतका खर्च** मनपा फंडातील स्वच्छ भारत अभियान १ व २ या लेखाशिर्षा मधुन भागविण्यात येणार आहे.

तरी वरील तक्त्यानुसार दि.१७/०९/२०२५ ते दि.३०/१०/२०२५ रोजी स्वच्छ ही सेवा २०२५ हे अभियान वसई विरार शहर महानगरपालिका अंतर्गत राबविणेकरिता साहित्य पुरविणेकामी भांडार विभाग, सफाई कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य शिबिर आयोजित करणेकरिता वैद्यकीय आरोग्य विभाग, इको फ्रेन्डली वस्तू, टाकाऊ पासुन टिकाऊ वस्तू तयार करुन प्रदर्शन (Waste to Art) आयोजित करणेकरिता शाळा व महाविद्यालय तसेच Cleanliness Target Units (CTUs) स्वच्छता लक्ष्य युनिटचे मॅपिंग व सुशोभिकरण करणे, सागरी किनारपट्टी स्वच्छता मोहिम, सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता करणेकामी प्रभागनिहाय सहा.आयुक्त, मुख्य/ वरिष्ठ आरोग्य निरीक्षक, प्र. आरोग्य निरिक्षक व स्वच्छता निरिक्षक यांना पत्र देणेस तसेच स्वच्छ हरित उत्सव व स्वच्छता अभियानाचा पूरस्कार स्पर्धेकरिता होणारा अंदाजित **रक्कम रुपये ५१,०००/- (अक्षरी एकावन्न हजार मात्र)** इतका खर्च मनपा फंडातील

स्वच्छ भारत अभियान १ व २ या लेखाशिर्षां मधुन भागविण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ (अ), कलम ६३, कलम ६६, कलम ७३ (क) व (ड), कलम ७२ (ब) अन्वये मा.आयुक्तांनी मला प्रदान केलेल्या अधिकारानुसार प्रशासकिय व वित्तिय मान्यता मिळणेस्तव पुढील ठराव करण्यात येत आहे.

**ठराव निर्णय** :- "स्वच्छता ही सेवा २०२५ अभियान", दि.१७/०९/२०२५ ते दि.०२/१०/२०२५ रोजीपर्यंतच्या पंधरवडा अंतर्गत "स्वच्छ हरित उत्सव व स्वच्छता अभियानाचा पूरस्कार" या स्पर्धेकरिता होणारा अंदाजित **रक्कम रुपये ५१,०००/- (अक्षरी एकावन्न हजार मात्र)** इतका खर्च मनपा फंडातील स्वच्छ भारत अभियान १ व २ या लेखाशिर्षा मधुन भागविण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ (अ), कलम ६३, कलम ६६, कलम ७३ (क) व (ड), कलम ७२ (ब) अन्वये मा.आयुक्तांनी मला प्रदान केलेल्या अधिकारानुसार प्रशासकिय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

**(अर्चना दिवे)**
**उपायुक्त**
**घनकचरा व्यवस्थापन विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (प.), जि. पालघर, पिन नं.४०१३०३
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल :- vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र.** १४२२ — **विभाग : बांधकाम**

**दिनांक :** १६/१०/२०२५

---

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र. ८८, ९१ व १०५ मधील भोयदापाडा ते राजावली ते नायगाव पूर्व वामन ढाबा पर्यंत रस्ता मजबुतीकरण करणे व आर.सी.सी. पाईप गटार बांधणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकुर :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग 'जी' वालीव कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ८८, ९१ व १०५ मधील भोयदापाडा ते राजावली ते नायगाव पूर्व वामन ढाब्यापर्यंत जुना डांबरी रस्ता असून सदर रस्ता हा वालीव सातिवली व गोखिवरे येथील औद्योगिक वसाहतीत जोडणारा मुख्य रस्ता आहे. सदर ठिकाणी नागरी वस्ती मोठ्या प्रमाणात वाढली असून रहदारी मोठ्या प्रमाणात सुरू असते. सद्यस्थितीत सदर रस्ता खड्डेमय व उखडलेल्या स्वरुपात असल्यामुळे नागरीकांना शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना तसेच औद्योगिक वसाहतीत येणाऱ्या चाकरमान्यांना त्रास सहन करावा लागत आहे. पावसाळ्यात खूप ठिकाणी पाणी साचून अपघात होण्याच्या प्रमाणात वाढ झालेली आहे. सदर कामासाठी मा. आमदार महोदया स्नेहाताई दुबे पंडीत यांनी दि. १०/११/२०२५ रोजीचा आढावा बैठकीमध्ये सदर काम तातडीने करून घेणेबाबत सुचना करण्यात आल्या. तसेच सदर काम युध्दपातळीवर घेणेकरीता विविध पक्षाच्या पदाधिकाऱ्यांचे, समाज सेवकांचे पत्र तसेच तक्रारी ह्या कार्यालयात प्राप्त होत आहेत.

त्या अनुषंगाने सदर कामाची पाहणी करून रक्कम रु. २६,०७,७५,६९७/- अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. २६,०७,७५,६९७/-

दरसुची :-

कामाचे स्वरुप :-
रस्ता - लांबी १६५० मी रुंदी ९.५० मी.
लांबी ३९८० मी. रुंदी ७ मी.
लांबी ५३० मी. रुंदी १७ मी.
पाईप गटार - लांबी ३२५० मी. ९०० मी.मी. व्यासाचे Np3 पाईप

मालकी :-

स्थावर मालमत्ता नोंदवही क्र. १२८ :- पृष्ठ क्र. ०२ अनु.क्र. १० वर नोंद २०२५/२६

तरी सदर कामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेऊन तांत्रिक मंजुरी घेणे, ई-निविदा कार्यवाही करणे, संविदा मंजुरी करणे, लघुत्तम निविदाधारकासोबत करारनामा करून कार्यादेश देणे, काम सुरू करून विहित मुदतीत पुर्ण करणे व देयक सादर करणे इ. सर्व प्रक्रिया पुढील नमुद कालमर्यादेत पुर्ण होणे अपेक्षित आहे.

| अ.क्र. | बाब | अपेक्षित दिनांक |
|---|---|---|
| १ | प्रशासकीय व वित्तीय मान्यता ठराव | सक्षम प्राधिकाऱ्यांकडून मंजुरी मिळाल्यानंतर तात्काळ |
| २ | प्र. शहर अभियंता यांची तांत्रिक मंजुरी घेणे | २७/१०/२०२५ |
| ३ | निविदा प्रसिध्द करणे | ०४/११/२०२५ |
| ४ | प्रथम लिफाफा उघडणे | २१/११/२०२५ |
| ५ | द्वितीय लिफाफा उघडणे | २८/११/२०२५ |
| ६ | संविदा मंजुरी ठराव | ०८/१२/२०२५ |
| ७ | कार्यादेश देणे / करारनामा करणे | ११/१२/२०२५ |
| ८ | काम सुरू करणे | १५/१२/२०२५ |
| ९ | काम पुर्ण करणे | १४/०५/२०२६ |
| १० | देयक सादर करणे | २१/०५/२०२६ |
| ११ | देयकांचे प्रदान करणे | २८/०५/२०२६ |

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'जी' वालीव कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ८८, ९१ व १०५ मधील भोयदापाडा ते राजावली ते नायगाव पूर्व वामन ढाबा पर्यंत रस्ता मजबुतीकरण करणे व आर.सी.सी. पाईप गटार बांधणे कामी रक्कम रु. २६,०७,७५,६९७/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहेत. त्यानुसार सदरच्या कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजुरी घेऊन निविदेची कार्यवाही करणेस तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे.

तरी सदर कामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेऊन तांत्रिक मंजुरी घेणे, ई-निविदा कार्यवाही करणे, संविदा मंजुरी करणे, लघुत्तम निविदाधारकासोबत करारनामा करून कार्यादेश देणे, काम सुरू करून विहित मुदतीत पुर्ण करणे व देयक सादर करणे इ. सर्व प्रक्रिया पुढील नमुद कालमर्यादेत पुर्ण होणे अपेक्षित आहे.


| अ.क्र. | बाब | अपेक्षित दिनांक |
|---|---|---|
| १ | प्रशासकीय व वित्तीय मान्यता ठराव | सक्षम प्राधिकाऱ्यांकडून मंजुरी मिळाल्यानंतर तात्काळ |
| २ | प्र. शहर अभियंता यांची तांत्रिक मंजुरी घेणे | २७/१०/२०२५ |
| ३ | निविदा प्रसिध्द करणे | ०४/११/२०२५ |
| ४ | प्रथम लिफाफा उघडणे | २१/११/२०२५ |
| ५ | द्वितीय लिफाफा उघडणे | २८/११/२०२५ |
| ६ | संविदा मंजुरी ठराव | ०८/१२/२०२५ |
| ७ | कार्यादेश देणे / करारनामा करणे | ११/१२/२०२५ |
| ८ | काम सुरू करणे | १५/१२/२०२५ |
| ९ | काम पुर्ण करणे | १४/०५/२०२६ |
| १० | देयक सादर करणे | २१/०५/२०२६ |
| ११ | देयकांचे प्रदान करणे | २८/०५/२०२६ |

सदर कामाकरीता उपरोक्त नमुद केलेल्या कालमर्यादा पाळल्या न गेल्यास संबंधित विभाग प्रमुख व त्यांचे अधिनस्त कर्मचारी MCSR १९७९ प्रमाणे कार्यवाहीस पात्र राहतील. तसेच सदर कामामध्ये काही अपरिहार्य कारणास्तव (तांत्रिक, नैसर्गिक व इतर सबब कारणास्तव) विलंब झाल्यास त्या त्या वेळी विलंबास सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी घेणे बंधनकारक असेल. तरी वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र. ८८, ९१ व १०५ मधील भोयदापाडा ते राजावली ते राजावली ते नायगाव पूर्व वामन ढाबा पर्यंत रस्ता मजबुतीकरण करणे व आर.सी.सी. पाईप गटार बांधणे कामी रक्कम रु. २६,०७,७५,६९७/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहेत. तसेच इस्टीमेंट मधील प्रत्येक टप्प्यावर केलेल्या कामाचे Geo Tagged फोटोग्राफ्स सादर करणेत यावे. तदनंतरच कामाची रक्कम अदा करण्यात यावी. याबाबत शासनास प्रस्ताव पाठवावा शासनाकडून निधी प्राप्त न झालेस स्वनिधीतून खर्च करावा .

मनोजकुमार सूर्यवंशी (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (प)., ता.वसई, जि.पालघर, पिन – ४०१ ३०३
दूरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/२०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७
ई मेल – vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. १४२३

विभाग – विधी
दि. १७/१० /२०२५

प्रस्तावाचा विषय: - मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल याचिकेच्या सुनावणीत रिट याचिका क्र. १३४२८/२०२५ महानगरपालिकेच्या वतीने बाजू मांडणेकरिता ॲड. युवराज नारवणकर यांची नियुक्ती करून होणाऱ्या खर्चास मंजुरीस्तव प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर:- वसई तालुका ॲडव्हटायझर्स वेल्फेअर असोसिएशन यांनी वसई विरार शहर महानगरपालिका विरुद्ध मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. १३४२८/२०२५ दाखल केलेली आहे. सदर याचिकेमध्ये याचिकाकर्त्यांनी महानगरपालिकेने जाहिरात काढलेल्या ई-लिलावाच्या सूचना (e-auction notices) आणि निविदांना आव्हान दिले आहे. त्याचप्रमाणे टेंडरमधील कामाची व्याप्ती खूप मोठी आहे, ज्यामुळे सध्या दिलेला वेळ निविदाकारांना सर्व आवश्यक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी अपुरा आहे. त्यामुळे टेंडर (निविदा) भरण्यासाठी दिलेल्या मुदतीत किमान सहा महिन्यांची वाढ करण्यात यावी, अशी याचिकाकर्त्यांची मागणी आहे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र. १३४२८/२०२५ मध्ये वसई विरार शहर महानगरपालिकातर्फे बाजू मांडणेकरीता मा. आयुक्त महोदय यांनी ॲड. युवराज नारवणकर यांची सदर याचिकेकरीता नियुक्ती करण्याचे दि. १४ ऑक्टोबर २०२५ रोजी तोंडी आदेश देण्यात आलेले होते. त्यानुसार ॲड. युवराज नारवणकर यांना दि. १४ ऑक्टोबर २०२५ रोजी ई-मेलद्वारे त्यांचे फी स्ट्रक्चर (Fees Structure) कळविण्याची मागणी करण्यात आलेली होती.

सदर ईमेलच्या अनुषंगाने ॲड. युवराज नारवणकर यांनी दि. १६ ऑक्टोबर २०२५ रोजी ईमेलद्वारे त्यांचे फी स्ट्रक्चर (Fees Structure) खालील प्रमाणे देण्यात आलेले आहे.

| Sr.No. | Particulars | Bill/Estimate/Amounts |
|---|---|---|
| 1. | Conference<br>Reading Papers<br>Drafting<br>Vetting of Draft<br>Filing & E-scanning | 75000/- |
| 2. | Multiple Appearance at Interim Stage<br>Multiple Appearance at Admission Stage | 75000/- |
| 3. | Multiple Appearance at Final Stage | 75000/- |
| 4. | Out of pocket expenses | At Actuals |

महानगरपालिकेच्या वतीने ॲड. युवराज नारवणकर यांची नियुक्ती करून प्रस्तावित उक्त दरानुसार व्यावसायिक शुल्क देण्यासाठी होणारा खर्च अर्थसंकल्पातील **'दावे आणि खटले फी'** या लेखाशिर्षकातून भागविण्यात येईल.

तरी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र. १३४२८/२०२५ महानगरपालिकेच्या वतीने ॲड. युवराज नारवणकर यांची नियुक्ती करून प्रस्तावित उक्त दरानुसार कामकाजनिहाय होणारे त्यांचे फी देयक अदा करणेकामी होणाऱ्या खर्चास मंजुरीस्तव प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव सविनय सादर.

..........................................................................................................................................................

ठरावः - मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र. १३४२८/२०२५ महानगरपालिकेच्या वतीने ॲड. युवराज नारवणकर यांची नियुक्ती करून प्रस्तावित उक्त दरानुसार कामकाजनिहाय होणारे त्यांचे फी देयक अदा करणेकामी होणाऱ्या खर्चास मंजुरीस्तव प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

मनोजकुमार सूर्यवंशी, (भा.प्र.से)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव क्र. १४२४

विभाग :- घनकचरा व्यवस्थापन

दिनांक :- २४/१०/२०२५

प्रस्तावाचा विषय :- नागरी घनकचरा व्यवस्थापन दैनंदिन रस्ते सफाई, गटार सफाई व कचरा संकलन करुन क्षेपणभुमीवर वाहतुक करणेसाठीच्या त्रैवार्षिक निविदेस मुदतवाढ देऊन होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- नागरी घनकचरा व्यवस्थापन हाताळणी अधिनियम २०१६ अन्वये महानगरपालिका अंतर्गत असलेल्या प्रभाग समिती निहाय २० झोनसाठी दैनंदिन रस्ते सफाई, गटार सफाई व कचरा संकलन करुन क्षेपणभुमीवर वाहतुक करणे इत्यादी कामांसाठी सन २०१८-१९, २०१९-२०, २०२०-२१ या त्रैवार्षिक वर्षाकरिता सर्वसाधारण सभा ठराव क्र.२६ दि.२०/०२/२०१७ रोजी प्रशासकीय मान्यता घेऊन दिनांक ०२/०३/२०१७ रोजी ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली होती.

सदरील निविदेमध्ये आलेल्या दरास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.४४९ दिनांक १२/१२/२०१७ अन्वये प्राप्त दरास मान्यता देऊन घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत दैनंदिन रस्ते सफाई, गटार सफाई व कचरा संकलन करुन क्षेपणभुमीवर वाहतुक करणे या त्रैवार्षिक निविदेच्या प्रक्रिये अंतर्गत प्राप्त झालेल्या निविदाधाराकांपैकी कमी दराच्या निविदाकारांच्या दरास मंजूरी देऊन करारनामा करुन कार्यादेश देणेस मंजूरी दिली होती. त्याअनुषंगाने दिनांक ३०/०१/२०१८ रोजी करारनामा करुन दिनांक २०/०२/२०१८ रोजीचा निविदाकारांना कार्यादेश देण्यात आलेला होता. याकामी सन २०१७-१८, सन २०१८-१९ व सन २०१९-२० या त्रैवार्षिक वर्षाकरिता २० झोनमध्ये २० अभिकर्त्यांची नियुक्ती केली असून सदरचे काम १ वर्ष उशिरा सुरू झाल्याने कार्यादेशानुसार सदरच्या कामची मुदत १ वर्ष (सन २०२०-२१ पर्यंत) वाढवून दिलेली होती.

परंतु सदर निविदेचा कालावधी दि.२८/०२/२०२१ रोजी संपुष्टात येत असल्याने प्रशासकीय ठराव क्र.५७८ दि.०८/०३/२०२१ अन्वये पुढील ६ महिन्याकरिता कोणतीही भाववाढ न देता प्रथम मुदतवाढ मंजूर केलेली होती. त्यानंतर प्रशासकीय ठराव क्र.३४७, दि.१२/०७/२०२१ अन्वये सन २०२१-२२ ते सन २०२५-२६ या पाच वर्षाच्या कालावधीकरिता निविन ई-निविदा प्रक्रिया करणेस प्रशासकीय ठराव मंजूर करण्यात आला होता आणि दि. २०/०७/२०२१ रोजी जाहिर ई-निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती.

सदर निविदा प्रक्रिये विरुद्ध विद्यमान ठेकेदार मे. श्री. अनंत इंटरप्रायजेस, मे. रेन्बो कन्स्ट्रक्शन, मे. उजाला लेबर कॉन्ट्रॅक्टर, मे. साई गणेश इंटरप्रायजेस, मे. रिलायबल एजन्सी, मे. हेना इंटरप्रायजेस, मे. मेनदीप इंटरप्रायजेस, मे. शिवम इंटरप्रायजेस यांनी मा. उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केली होती. सदर याचिका **"मे. श्री. अनंत एन्टरप्रायझेस व इतर विरुद्ध वसई विरार शहर महानगरपालिका"** मध्ये मा. उच्च न्यायालयात Writ Petition no 4964/2021 मधील Interim Application No.2153/2021 आणि Interim application no.4338/2023 मध्ये खालीलप्रमाणे निर्देश देण्यात आलेले आहेत.

सहा. आयुक्त

वसई विरार शहर महानगरपालिका

| Sr. No. | Writ Petition no | Order |
|---|---|---|
| 1 | Writ Petition no. 4964/2021order dated 15/09/2021 | **a)** In view of the aforesaid statement in the Affidavit-in-Reply, we are of the view that no useful purpose would be served in opening the bids at this juncture and it would be in the fitness of things, that the opening of bids be deferred, in as much as there is likelihood of the election of the Respondent-Corporation being held in the near future and the standing committee of the Respondent - Corporation would be in place. It is required to be noted that the administrator (i.e. Respondent No. 2 Municipal Commissioner) was appointed for the respondent- corporation only because the tenure of the general body of the Respondent-Corporation had expired and election have been postponed due to the covid-19 pandemic. We also note that the tender value is about Rs. 661 crore.<br>**b)** The petitioners/ Respondent -Corporation would be at liberty to move the court to seek further ad- interim relief and/or to vary this order in the event the election are held and /or the six (6) month period of the contracts of the petitioners are to come to an end. All contentions of the parties are kept open for the purpose of the grant or refusal of ad-interim/ interim relief, which may be considered without being influenced by this order. The petition is pending before the hon'ble Court. |
| 2 | Interim application no. 2153/2021order dated 14/02/2022 | Without prejudice to the rights and contentions of the Applicants/ Petitioners, in as much as the Applicants/ Petitioners have already granted extension of contract for of six months, we permit the Applicants/ Petitioners to make representation for further extension. If such Application is made within four days from today, the same may be decided within two weeks from the date of the representation. |
| | Representation made by petitioners on dated 23/03/2022 | On dated 06/04/2022 order passed, The time limit given by the Hon'ble High Court for the first six months has expired on 28/02/2022 and as the elections have not yet taken place , the time limit has been extended by one month. The decision must be communicated to the High Court. |
| 3 | Interim application no.4338/2023 order dated 03/05/2023 | The learned counsel for the petitioners, on instructions, submits that the petitioners would avail the remedy before the Arbitrator. |

सही. आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

| Sr. No. | Writ Petition no | Order |
|---|---|---|
| | Arbitration proceeding case no. 1/2 023. order dated 29/12/2023 | In view of facts, provision and documents provided on record, the contract period is subsistence for seven years from the date of issue of letter of acceptance and hence the application is allowed. The contract period of the claimant shall be extended for subsequent operating year as per the provisions of contract agreement. |

वरीलप्रमाणे न्यायालयीन प्रक्रिया व आवश्यकतेनुसार सदर कामास खालीलप्रमाणे मुदत वाढ देण्यात आली असून त्याचा कारणांसह तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| मुदतवाढ क्र. | ठराव | दिनांक | कालावधी |
|---|---|---|---|
| १ | प्रशासकीय ठराव क्र.५७८ | ०८/०३/२०२१ | ६ महिने |
| २ | प्रशासकीय ठराव क्र.५२६ | २७/०८/२०२१ | ६ महिने |
| ३ | प्रशासकीय ठराव क्र. ०२ | ०६/०४/२०२२ | १ महिने |
| ४ | प्रशासकीय ठराव क्र.७५ | २२/०४/२०२२ | १ वर्ष |
| ५ | प्रशासकीय ठराव क्र.३०४२ | ३१/०३/२०२३ | ०१/०४/२०२३ ते ३०/०६/२०२३ (३ महिने) |
| ६ | प्रशासकीय ठराव क्र.११७० | ३१/०७/२०२३ | ०१/०७/२०२३ ते ३०/०९/२०२३ (३ महिने) |
| ७ | प्रशासकीय ठराव क्र.१७७८ | २७/०९/२०२३ | ०१/१०/२०२३ ते ३१/१२/२०२३ (३ महिने) |
| ८ | प्रशासकीय ठराव क्र.२८६४ | २५/०१/२०२४ | ०१/०१/२०२४ ते ३१/१२/२०२४ (१ वर्ष) |
| ९ | प्रशासकीय ठराव क्र.१९२५ | ३१/१२/२०२४ | ०१/०१/२०२५ ते २८/०२/२०२५ (२ महिने) |
| १० | प्रशासकीय ठराव क्र. २३६० | २८/०२/२०२५ | ०१/०३/२०२५ ते ३१/०३/२०२५ (१ महिना) |
| ११ | प्रशासकीय ठराव क्र. २५९२ | २७/०३/२०२५ | ०१/०४/२०२५ ते ३०/०४/२०२५ (१ महिना) |
| १२ | प्रशासकीय ठराव क्र. १५८ | २८/०४/२०२५ | ०१/०५/२०२५ ते ३०/०६/२०२५ (२ महिने) |
| १३ | प्रशासकीय ठराव क्र. ८७४ | २६/०६/२०२५ | ०१/०७/२०२५ ते ३१/०७/२०२५ (१ महिना) |
| १४ | प्रशासकीय ठराव क्र. १२९९ | ३०/०९/२०२५ | ०१/०८/२०२५ ते ३०/०९/२०२५ (२ महिना) |

सदर ठेक्याच्या कालावधी वर नमुद तक्त्यातील अनु. क्र. ८ नुसार दि.३१/१२/२०२४ रोजी संपुष्टात येत असल्याने नवीन ई-निविदा जाहिर करणे आवश्यक होते. त्याअनुषंगाने वसई विरार शहर महानगरपालिकेने प्रशासकीय ठराव

उप. आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

क्र. १३३२ दि. ०९/१०/२०२४ अन्वये सन २०२४-२५, सन २०२५-२६, सन २०२६-२७ ही त्रैवार्षिक निविदा दि. ११/१०/२०२४ रोजी जाहीर करण्यात आलेली निविदा प्रशासकीय ठराव क्र. १२९, दि. २३/०४/२०२५ अन्वये रद्द करण्यात आलेली आहे. तद्नंतर वसई विरार शहर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागातंर्गत प्रभाग समिती ए ते आय हद्दीतील दैनंदिन रस्ते सफाई, गटार सफाई आणि वर्गीकृत/ विलगीकृत कचरा संकलन करून क्षेपणभुमीवर वाहतुक करणे या कामासाठी सन २०२४-२५, २०२५-२६ व २०२६-२७ या त्रैवार्षिक वर्षाकरिता दिनांक ०९/०५/२०२५ रोजी जाहीर करण्यात आलेली निविदा प्रशासकीय ठराव क्र. १२७५, दि. २६/०८/२०२५ अन्वये रद्द करण्यात आलेली आहे.

तथापि, दैनंदिन साफसफाई हा अत्यावश्यक सेवेचा भाग असून सदर कामामध्ये खंड पाडणे नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने हितावह नाही. याकामी घनकचरा व्यवस्थापन विभागातंर्गत प्रभाग समिती ए ते आय हद्दीतील दैनंदिन रस्ते सफाई आणि वर्गीकृत/ विलगीकृत कचरा संकलन करून क्षेपणभुमीवर वाहतुक करणे या कामाची ५ वर्षांकरिता निविदा दि.२६/०९/२०२५ रोजी जाहिर करण्यात आलेली आहे. तसेच चालू कामाची मुदतवाढ दि. ३१/०९/२०२५ संपुष्टात आल्याने सद्यस्थितीत चालू असलेल्या कामास नविन निविदा प्रक्रिया करुन कार्यादेश देणेकामी २ महिन्यांचा (नोव्हेंबर अखेरपर्यंत कालावधी आवश्यक आहे. याबाबत २ महिन्याची मुदतवाढ गृहित धरून याकामी येणारा अंदाजित खर्च खालील प्रमाणे गृहीत धरण्यात आलेला आहे.

**<u>प्रस्तावित २ महिन्याची मुदतवाढ :-</u>**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | प्रभाग समिती | झोन क्र. | मासिक खर्च (सप्टेंबर २०२५) | २ महिन्यासाठी होणारा खर्च (रू) |
|---|---|---|---|---|---|
| १ | मेनदीप इंटरप्रायजेस | A | १ | १,६२,६६,२७०/- | ३,२५,३२,५४०/- |
| २ | उजाला लेबर कॉन्ट्रॅक्टर | B | २ | १,१७,९१,१९७/- | २,३५,८२,३९४/- |
| ३ | साई गणेश इंटरप्रायजेस | | ३ | १,५१,२६,३६०/- | ३,०२,५२,७२०/- |
| ४ | रेन्बो इंटरप्रायजेस | C | ४ | ४९,२५,९१२/- | ९८,५१,८२४/- |
| ५ | हेना इंटरप्रायजेस | | ५ | ९७,८८,५८१/- | १,९५,७७,१६२/- |
| ६ | दिनंश बी. संखे | D | ६ | ७०,९६,८१४/- | १,४१,९३,६२८/- |
| ७ | रिलायबल एजन्सी | | ७ | ४८,५३,१७७/- | ९७,०६,३५४/- |
| ८ | हेना इंटरप्रायजेस | | ८ | १,१०,५१,१२०/- | २,२१,०२,२४०/- |
| ९ | दिनेश बी. संखे | E | ९ | १,२०,८४,८०७/- | २,४१,६९,६१४/- |
| १० | साई गणेश इंटरप्रायजेस | | १० | ६६,१८,९१३/- | १,३२,३७,८२६/- |
| ११ | हेना इंटरप्रायजेस | F | ११ | ५०,२५,९०४/- | १,००,५१,८०८/- |
| १२ | उजाला लेबर कॉन्ट्रॅक्टर | | १२ | ६९,७६,७१०/- | १,३९,५३,४२०/- |
| १३ | उजाला लेबर कॉन्ट्रॅक्टर | | १३ | ७०,१७,४०६/- | १,४०,३४,८१२/- |
| १४ | रिलायबल एजन्सी | G | १४ | ४१,५०,८९७/- | ८३,०१,७९४/- |
| १५ | शिवम इंटरप्रायजेस | | १५ | ६४,२१,२२५/- | १,२८,४२,४५०/- |
| १६ | साई गणेश इंटरप्रायजेस | | १६ | ५६,४१,८८०/- | १,१२,८३,७६०/- |
| १७ | रिलायबल एजन्सी | H | १७ | २,०१,६०,९२९/- | ४,०३,२१,८५८/- |

अति. आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १८ | मनदीप इंटरप्रायजेस | I | १८ | ८६,१४,३३६/- | १,७२,२८,६७२/- |
| १९ | आर.बी.इन्फ्रा.प्रो.लि. | | १९ | ५६,९२,०८१/- | १,१३,८४,१६२/- |
| २० | दिनेश बी. संखे | | २० | ४०,२२,९४८/- | ८०,४५,८९६/- |
| **एकुण** | | | | **१७,३३,२७,४६७/-** | **३४,६६,५४,९३४/-** |

वरीलप्रमाणे कामगारांच्या किमान वेतनात डी. ए. मध्ये वाढ होत असते, त्याप्रमाणे संभावित खर्चात वाढ होऊ शकते त्याअनुषंगाने सदर वाढ देय राहील.

तरी, रस्ते सफाई, गटार सफाई, कचरा संकलन करून क्षेपणभूमीवर वाहतुक करणे या कामासाठी नेमणुक केलेल्या अभिकर्त्यांना २ महिन्याची मुदतवाढ दिल्यास अंदाजित रक्कम रू. **३४,६६,५४,९३४/-** इतका खर्च होऊ शकतो.

सदरचा खर्च सन २०२५-२६ या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पातील घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत अनुदानासह, रस्ता, गटारे, नाले, सार्वजनिक ठिकाणे इ. साफसफाईसाठी घंटागाडी, यांत्रीक झाडू उपलब्ध करणेसह सफाई ठेका व भाड्याच्या वाहनाद्वारे यांत्रिक पद्धतीने नालेसफाई या लेखाशिर्षातील प्रस्तावीत तरतुद रक्कम रू.३५० कोटी मधून भागविणे शक्य आहे.

तरी, दि.०१ ऑक्टोंबर २०२५ ते दि.३० नोव्हेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ देऊन होणाऱ्या अंदाजित रक्कम रू. **३४,६६,५४,९३४/-** व होणाऱ्या संभावित खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी घनकचरा व्यवस्थापन विभागाने शिफारस केली आहे, त्यानुसार पुढीलप्रमाणे ठराव करण्यात येत आहे.

ठराव निर्णय :- नागरी घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत दैनंदिन रस्ते सफाई, गटार सफाई, कचरा संकलन करून क्षेपणभूमीवर वाहतुक करणेसाठीच्या त्रैवार्षिक निविदेस दि.०१ ऑक्टोंबर २०२५ ते दि. ३० नोव्हेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ देऊन होणाऱ्या अंदाजित रक्कम रू. **३४,६६,५४,९३४/-** व होणाऱ्या संभावित खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेत येत आहे.

**मनोजकुमार सुर्यवंशी** (भा.प्र.से.)
**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

वसई - विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार (पश्चिम), जि.पालघर, पिन नं.401303
दुरध्वनी -2020-2525101/02/03/04 05/06, फॅक्स् -0250-2525107
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. १४२५ | विभाग : बांधकाम विभाग
दिनांक: २१/१०/2025

**विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (डी) मधील वॉर्ड क्र. ५१ मध्ये निलगिरी सोसायटी, मथुरा नगर येथे सी.सी. गटार बांधणे.**

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रकीय रक्कम | :- | रु. ३,७३,१७०/- |
| मंजूर अंदाजपत्रकीय रक्कम | :- | रु. ३,७३,१७०/- |
| प्रशासकीय मान्यता | :- | प्रशासकीय मंजुरी ठराव क्र. ०२ दि. ०९/०९/२०२५ |
| तांत्रिक मान्यता | :- | कार्यकारी अभियंता यांची पु. क्र. D पृष्ठ क्र. ७/४४ दि. १०/९/२०२५ |
| निविदा प्रसिद्धी | :- | वविशम/बांध/ ४३६/२०२५-२६ दि. २९/०९/२०२५ उप आयुक्त, प्रभाग समिती 'डी' |
| वृत्तपत्रातील निविदा प्रसिद्धी दि. | :- | दि. २९/०९/२०२५ |
| वृत्तपत्राचे नाव | :- | स्थानिक नोटीस बोर्ड |
| निविदा प्रिपरेशनची तारीख | :- | दि. ०८/१०/२०२५ |
| विहीत मुदतीत प्राप्त निविदा | :- | **०३** |
| निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा) | :- | दि. ०८/१०/२०२५ |
| निविदा उघडण्याची दिनांक (द्वितीय लखोटा) | :- | दि. १४/१०/२०२५ |
| प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी | :- | शाखा.अभियंता **२)** प्र. लेखापाल **३)** सहाय्यक आयुक्त ४) उप मुख्य लेखा परिक्षक **५)** उप आयुक्त |

**प्राप्त निविदा उघडल्या असता त्याचे दर खालीलप्रमाणे आहेत.**

| अ. क्र | निविदाधारकाचे नाव | निविदा दर | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | मे. एकविरा कंन्स्ट्रक्शन | (+) ४% जास्त दराने | ३,८८,०९७/- | |
| २ | **मे. साने कंन्स्ट्रक्शन** | **अंदाजपत्रकीय दराने** | **३,७३,१७०/-** | |
| ३ | मे. अंश एंटरप्रायजेस | (+) ३% जास्त दराने | ३,८४,३६४/- | |

तरी **मे. साने कंन्स्ट्रक्शन** यांची **अंदाजपत्रकीय दराची** निविदा इतर निविदेच्या तुलनेत कमी, योग्य व वाजवी आहे. सदर कमी दराच्या निविदेस निविदा समितीने शिफारस केली असल्याने निविदा मंजुरीस्तव सादर.

सदर कामी लघुत्तम निविदाधारक यांची दर मंजुर प्राप्त करणे, करानामा करुन कार्यादेश देणे, काम सुरु करुन विहीत मुदतीत पुर्ण करणे व देयक सादर करणे इ. सर्व प्रक्रिया पुढील नमुद कालमर्यादा पुर्ण होणे अपेक्षित आहे.

| अ.क्र | बाब | अपेक्षित दिनांक |
|---|---|---|
| १ | प्रशासकीय व वित्तीय मान्यता ठराव | ०९/०९/२०२५ |
| २ | निविदा प्रसिद्ध करणे | २९/९/२०२५ |
| ३ | प्रथम लिफाफा उघडणे | ०८/१०/२०२५ |
| ४ | द्वितीय लिफाफा उघडणे | १४/१०/२०२५ |
| ५ | संविदा मंजुरी ठराव | २८/१०/२०२५ |
| ६ | कार्यादेश देणे / करारनामा करणे | ०६/११/२०२५ |
| ७ | काम सुरु करणे | ०७/११/२०२५ |
| ८ | काम पुर्ण करणे | ०६/०१/२०२६ |
| ९ | देयक सादर करणे | ०९/०१/२०२६ |
| १० | देयकाचे प्रदान करणे | २३/०१/२०२६ |
| ११ | उपयोगिता प्रमाणपत्र करणे | २९/०१/२०२६ |

तरी **वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (डी) मधील वॉर्ड क्र. ५१** मध्ये **निलगिरी सोसायटी, मथुरा नगर येथे सी.सी. गटार बांधणे** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७३ (ड) अन्वये लघुत्तम निविदाधारक **मे. साने कंन्स्ट्रक्शन** हयांचे सोबत संविदा करणे, २% सुरक्षा अनामत भरणे, करारनामा व कार्यादेश देणेस मान्यता मिळणेस सादर.

प्रस्ताव -

सदर काम खालील नमुद कालावधित पुर्ण होणेस अपेक्षित आहे.

| अ.क्र | बाब | अपेक्षित दिनांक |
|---|---|---|
| १ | प्रशासकीय व वित्तीय मान्यता ठराव | ०९/०९/२०२५ |
| २ | निविदा प्रसिद्ध करणे | २९/९/२०२५ |
| ३ | प्रथम लिफाफा उघडणे | ०८/१०/२०२५ |
| ४ | द्वितीय लिफाफा उघडणे | १४/१०/२०२५ |
| ५ | संविदा मंजुरी ठराव | २८/१०/२०२५ |
| ६ | कार्यादेश देणे / करारनामा करणे | ०६/११/२०२५ |
| ७ | काम सुरु करणे | ०७/११/२०२५ |
| ८ | काम पुर्ण करणे | ०६/०१/२०२६ |
| ९ | देयक सादर करणे | ०९/०१/२०२६ |
| १० | देयकाचे प्रदान करणे | २३/०१/२०२६ |
| ११ | उपयोगिता प्रमाणपत्र करणे | २९/०१/२०२६ |

**प्रस्ताव:-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अन्वये आयुक्त यांच्याकडील आदेश जा.क्र. ववविशम/ लेखा/ ७७/२०२५ दि. ०४/०८/२०२५ अन्वये महानगरपालिकेच्या कामकाज सोयीच्या दृष्टीने उपायुक्त व अति. आयुक्त यांना अधिकार प्रदान केले आहेत. सदर कामाकरिता वरील नमुद केलेल्या कालमर्यादा पाळल्या न गेल्यास विभाग प्रमुख व त्यांचे अधिनिस्त कर्मचारी MCSR १९७९ प्रमाणे कार्यवाहिस पात्र राहतील तसेच सदर कामामध्ये काही कारणास्तव (तांत्रिक, नैसर्गिक व इतर सबळ कारणास्तव) विलंब झाल्यास त्या त्या वेळी विलंबास सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी घेणे बंधनकारक असेल **वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (डी) मधील वॉर्ड क्र. ५१ मध्ये निलगिरी सोसायटी, मथुरा नगर येथे** सी.सी. **गटार बांधणे** कामी सहभागी झालेल्या निविदा धारकांपैकी लघुत्तम **मे. साने कंन्स्ट्रक्शन** यांची **अंदाजपत्रकीय दराची** निविदा मंजुर करण्यात येत असुन लघुत्तम निविदा धारकांसोबत संविदा करणे २% सुरक्षा अनामत भरणे तसेच करारनामा कार्यादेश देणेकरिता महानगरपालिका अधिनियम ७३ (ड) अन्वये मान्यता देणेत येत आहे. तसेच अंदाजपत्रक मधील प्रत्येक टप्प्यावर केलेल्या कामाचे Geo - Tagging फोटोग्राफ्स सादर करणेत यावे. तदनंतर कामाची रक्कम अदा करण्यात यावी.

(अजित मुठे)
उप आयुक्त
परिमंडळ -3
वसई - विरार शहर महानगरपालिका